रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८८ ▌अंक २२५ ▌पृष्ठ ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल
रायगड, रविवार, दि. १२ जानेवारी २०२५
किंमत ४ ₹

## पोकलेन अंगावर पडून चालकाचा मृत्यू

**नवी मुंबई :** ट्रेलरमधून पोकलेन उतरवित असताना चालकाचे पोकलेनवरील नियंत्रण सुटल्याने घाबरून पोकलेनमधून खाली उडी मारणाऱ्या चालकाच्या अंगावर पोकलेन पडल्याने त्याचा मृत्यू झाला. ही घटना बुधवारी दुपारी उरणमधील करळ सोनारी फाटा येथील रेल्वेच्या एका प्रकल्पस्थळी घडली. या अपघाताला स्वत: पोकलेन चालक जबाबदार असल्याचे आढळून आल्याने न्हावा-शेवा पोलिसांनी त्याच्यावर निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे. अजयकुमार मंगर महातो (वय २८) असे मृताचे नाव असून तो मूळचा झारखंडमधील वहाळ गाव येथे राहत होता. तसेच, तो पोकलेन चालक म्हणून काम करीत होता. उरणमधील करळ पान २ वर

## तीन प्रयोगशाळांत ‘एचएमपीव्ही’ चाचणी

**पुणे :** मानवी मेटान्यूमोव्हायरसच्या (एचएमपीव्ही) संशयित रुग्णांच्या घशातील स्त्रावांच्या नमुन्यांची तपासणी याआधी पुण्यातील राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेत (एनआयव्ही) होत होती. आता मुंबईच्या कस्तुरबा संसर्गरोग रुग्णालय व नागपूरच्या ‘ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स’मध्येही (एम्स) तपासणी होणार आहे. त्याचे जनुकीय क्रमनिर्धारणदेखील (जिनोम सिक्वेन्सिंग) या प्रयोगशाळांत केले जाणार आहे. चीनमध्ये गंभीर तीव्र श्वसन आजाराच्या रुग्णांमध्ये वाढ झाली असून त्याचे कारण प्रामुख्याने ‘एचएमपीव्ही’ म्हटले जात आहे. त्याबाबत स्पष्टीकरण देताना आरोग्य विभागाने हा विषाणू २००१ पासून अस्तित्वात असून, नेदरलँडमध्ये सुरुवातीचे पान २ वर

**वेधक**

### रिक्षाच्या अपघातात दोघांचा मृत्यू



**खोपोली :** पाली-खोपोली मार्गावर शुक्रवारी (दि.११) पहाटे अज्ञात वाहनाने रिक्षाला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. यामध्ये रिक्षातील दोघांचा जागीच मृत्यू झाला आहे तर एक जण गंभीर जखमी झाला आहे.

पाली-खोपोली मार्गावरून कंपनीतून रात्रपाळी करून रिक्षा चालक क्रमांक महेश खरात (रा.कळंब ता.सुधागड) हे घरी जात असताना दुरशेतजवळ आले असता अज्ञात वाहनाने तिला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात रिक्षातील रामदास ज्ञानेश्वर घोगरकर आणि अजित हरिशचंद्र वाघमारे (रा. घोडपापड, जांभूळपाडा) या दोन जणांचा जागीच मृत्यू झाला तर रिक्षा चालक महेश खरात हा गंभीर जखमी असल्याने त्याला तात्काळ एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले.

अजित वाघमारे यांची दोन लहान मुले आहेत तर रामदास घोगरकर हा एकुलता एक मुलगा आहे. अपघातप्रकरणी नातेवाईकांनी तपासाची मागणी केली आहे.

# सराईत गुन्हेगार हद्दपार

## नऊ हजारहून अधिक जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई

## सहा टोळ्यांसह ३५ जणांची केली जिल्ह्यातून हकालपट्टी

| प्रमोद जाधव |
| अलिबाग |

**गावांमध्ये खुलेआम गुंडगिरी करून दहशत निर्माण करणाऱ्या गावगुडांमुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. या गावगुंडांना रायगडच्या पोलीस दलाने कारवाई करीत दणका दिला आहे. वर्षभरात नऊ हजारहून अधिक जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करीत ३५ हून अधिक जणांबरोबरच सहा गुन्हेगारी टोळ्यांना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. पोलिसांच्या या कारवाईने गावांतील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचा प्रयत्न केला आहे.**

जिल्ह्यात २८ पोलीस ठाणे आहेत. पोलीस अधीक्षक यांच्या अधिपत्याखाली जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्याचा प्रयत्न केला जातो. ग्रामीण भागासह शहरी भागात शांतता निर्माण व्हावी, यासाठी पोलिसांकडून वारंवार आवाहन केले जाते. तरीदेखील काही महाभाग आपल्या ताकदीच्या व पैशाच्या जोरावर गावांमध्ये गुंडगिरी करून दहशत निर्माण करीत असतात. किरकोळ कारणावरून मारहाण करणे, धमकी देणे. गावातील वहिवाटीचा रस्ता अडवून वेठीस धरणे अशा अनेक प्रकारे त्रास देण्याचा प्रयत्न गावगुंड कायमच करीत असतात. त्यांच्याविरोधात बोलणाऱ्यांना त्रास देण्याचा प्रयत्न हे गावगुंड करीत असतात. काहींना राजकीय बळ मिळत असल्याने गावामध्ये भितीचे वातावरण निर्माण करतात. त्याचा नाहक त्रास नागरिकांना होतो.

वेगवेगळ्या कामात सर्वसामान्यांचा अडकाव करीत असल्याचा प्रकार असतो. काही जण गावागावात टोळक्या तयार करून गुंडगिरी करतात. जिल्ह्यात सण, उत्सव यात्रा आदी कार्यक्रम मोठ्या प्रमाणात होतात. याचा फायदा घेत काहीजण कायदा व सुव्यवस्था बिघडवण्याचा प्रयत्न करतात. गावगुंडगिरी करणाऱ्या तरुणांसह टोळक्याने राहून दहशत निर्माण करणाऱ्या टोळीला देखील पोलिसांकडून वारंवार सूचना केल्या जातात. तरीदेखील काही मंडळी याकडे दुर्लक्ष करीत असतात. जिल्ह्यातील नागरिकांना मोकळा श्वास घेता यावा, त्यांना भयमुक्त वातावरणात फिरता यावे यासाठी रायगड पोलिसांनी गुन्हेगारी टोळीसह गावगुंडाची माहिती घेण्याचे काम केले. त्यांना पोलीस ठाणे स्तरावर समजावण्याचाही प्रयत्न करण्यात आला. तरीदेखील गावगुंडाची मक्तेदारी सुरुच राहिली. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी रायगड पोलिसांनी वेगवेगळ्या पध्दतीने कारवाईची मोहिम यावर्षात आखली. जिल्ह्यातील गुन्हेगारी टोळीची माहिती घेऊन त्यांच्याविरोधात कारवाई करण्यात आली. मुंबई पोलीस अधीनिअम कलम ५५ अन्वये सहा गुन्हेगारी टोळ्या जिल्ह्यातून हद्दपार केल्या. मुंबई पोलीस अधिनिअम कलम ५६ व ५७ अन्वये जिल्ह्यातील ३५ जणांना हद्दपार केले. नऊ हजार ५१४ जणांविरोधात विरोधात वेगवेगळ्या कलमाखाली प्रतिबंधात्मक कारवाई केली. जिल्ह्यात वाढत्या गुंडगिरीला रोखण्यासाठी रायगड पोलिसांनी कंबर कसली. काही गाव गुंडाविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना कारागृहात पाठविण्याची व्यवस्थादेखील केली आहे. २०२४ मध्ये लोकसभा व विधान सभा निवडणुका पार पडल्या. या निवडणुकांमध्ये प्रतिबंधात्मक कारवाई करणे गरजेचे होते. त्यादृष्टीने पोलिसांनी कारवाई केली. जिल्ह्यात ऑल आऊट ऑपरेशन सुरु केले. या ऑपरेशनच्या माध्यमातून फरार आरोपींसह काही घातपात करण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींना ताब्यात घेत त्यांच्याविरोधात कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईने गावगुंडांना खाकी वर्दीचा दणका मिळाला आहे.

> **जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी रायगड पोलीस कायमच प्रयत्न करीत आहे. या वर्षात विधानसभा व लोकसभा निवडणूका पार पडल्या. या कालावधीत काही अनुचित प्रकार घडू नये. कायदा व सुव्यवस्था बिघडू नये यासाठी प्रभावीपणे प्रतिबंधात्मक कारवाया केल्या आहेत. या कालावधीत गावगुंडावर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला. – सोमनाथ घार्गे**
> पोलीस अधीक्षक, रायगड



# कृषीवलतर्फे गुरुवारी हळदी कुंकू

| अलिबाग | प्रतिनिधी |

आपल्या लेखणीच्या माध्यमातून तळागाळातील घटकांना न्याय देणाऱ्या रायगड जिल्ह्यातील कृषीवल वृत्तपत्रातर्फे दरवर्षी महिलांसाठी हळदी कुंकू सोहळ्योचे आयोजन करण्यात येते. यावर्षीही खास महिलांसाठी हळदी कुंकू समारंभाचे आयोजन गुरुवारी (दि.१६) पीएनपी नाट्यगृहात सायंकाळी ४ वाजता करण्यात आले आहे. कृषीवलच्या माजी व्यवस्थापकीय संचालिका चित्रलेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थित होणाऱ्या सोहळ्यामध्ये स्टार प्रवाह वाहिनीतील वेगवेगळ्या मालिकेमधील सिनेतारका आकर्षण ठरणार आहेत. गेल्या अनेक वर्षापासूनची ही परंपरा जपण्यात आली आहे.

हळदी कुंकू म्हणजे प्रत्येक महिलांसाठी मानाचा दिवस मानला जातो. गेल्या अनेक वर्षापासून कृषीवलने महिलांचा हा सन्मान जपण्याचा प्रयत्न केला आहे. मकरसंक्रातीनिमित्त हळदी कुंकू समारंभ गेल्या अनेक वर्षापासून अलिबागमध्ये मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. वेगवेगळ्या स्तरातील २० हजारहून अधिक महिला या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवितात. यंदादेखील महिलांच्या हक्काचे व सौभाग्याचे प्रतीक समजला जाणारा हळदी कुंकूचा समारंभ गुरुवारी सायंकाळी चार ते सात यावेळेत होणार आहे. यावर्षीदेखील कार्यक्रमाच्यावेळी सिनेतारकांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.





### स्टार प्रवाहवरील मालिकांमधील दिग्गज कलाकारांची राहणार उपस्थिती

### या कलाकारांची राहणार उपस्थिती

**लग्नानंतर होईलच प्रेम या मालिकेतील काव्या तथा ज्ञानदा रामतीर्थकर, येड लागलं प्रेमाचं या मालिकेतील मंजिरी तथा पुजा बिरारी, साधी माणसं या मालिकेतील मीरा तथा शिवानी बावनकर या तीन अभिनेत्रींबरोबरच सत्या तथा आकाश नलावडे या अभिनेत्याचीही उपस्थिती राहणार आहे. त्यामुळे हळदी कुंकू समारंभाला या सिनेतारकांचे मोठे आकर्षण राहणार आहे. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन कृषीवलच्या माजी व्यवस्थापकीय संचालिका तथा शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी केले आहे.**

# पाली बसस्थानकाची रखडपट्टी

| पाली/बेणसे | धम्मशील सावंत |

अष्टविनायक तीर्थक्षेत्र व सुधागड तालुक्यातील मुख्यालयाचे ठिकाण असलेल्या पालीतील बसस्थानकाच्या नूतनीकरणाचे काम मागील पाच वर्षांपासून रखडले आहे. नवीन इमारतीच्या पुनर्बांधणीस व नूतनीकरणास अजूनही सुरुवात झालेली नाही.

तसेच स्थानकाला खड्डे, जुन्या तोडलेल्या इमारतीचे डेब्रिज, उघडे नाले, दुर्गंधी आदी विविध समस्यांनी वेढले आहे. परिणामी येथील प्रवाशांची प्रचंड गैरसोय होत आहे. बसस्थानकाच्या दुरवस्थेकडे शासन व लोकप्रतिनिधी कोणाचेही लक्ष नाही.

साधारणतः तीन वर्षांपूर्वी पाली बस स्थानकाची जुनी धोकादायक इमारत तोडण्यात आली आहे. त्यावेळी स्थानक आवारात व स्वच्छतागृह बांधण्यात आले. तात्पुरत्या स्वरूपाची निवारा शेड निवारा शेड छोटी असल्यामुळे प्रवाशांना बसण्यासाठी अडचण होते. मात्र त्यानंतर आजतागायत परिवहन पान २ वर





### ठेकेदार काळ्या यादीत

**नवीन बस स्थानक नुतनीकरणासाठी तब्बल २ कोटी ३६ लाखांचा निधी नोव्हेंबर-डिसेंबर २०१९ मध्ये मंजूर झाला होता. तसेच इमारतीच्या प्रत्यक्ष बांधकामास जानेवारी २०२० पासून सुरुवात होणार होती. मात्र यावेळी काही अडचणी आल्याने ठेकेदाराने काम बंद केले. या ठेकेदाराला काळ्या यादीतदेखील टाकण्यात आले. मात्र आजतागायत नवीन इमारतीची अजून एक वीट सुद्धा बसविण्यात आलेली नाही.**

> **स्थानकाच्या बाजूने नाला जातो. त्यामुळे स्थानकामध्ये नाल्याचे पाणी साठते. स्थानकाची इमारत उंच करणे अपेक्षित आहे. जुन्या प्रशासकीय मान्यतेत व टेंडरमध्ये या सर्व गोष्टी नमूद नव्हत्या. त्यामुळे या सर्व गोष्टी नमूद करून सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी मध्यवर्ती कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवला आहे. नूतनीकरणास अंदाजे १२ कोटी खर्च अपेक्षित आहे. प्रशासकीय मान्यता मिळाल्यावर लागलीच टेंडर काढले जाईल आणि पुढील प्रक्रिया वेगाने होईल. –मीनल मोरे, कार्यकारी अभियंता राज्य परिवहन महामंडळ मुंबई प्रदेश**

# वराठी ग्रामपंचायत अधिकारी निलंबित

### ■ मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी केली कारवाई

| महाड | प्रतिनिधी |

बैठकीला विनापरवानगी गैरहजर राहण्याबरोबरच १५ वा वित्त आयोगाचा खर्च कमी करणे, प्रधानमंत्री आवास योजना कामात जाणून बुजुन दुर्लक्ष केल्याचा ठपका ठेवत वराठी ग्रामपंचायत अधिकारी मोतिसिंग लहानुजी भस्मे यांना निलंबित करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी ही कारवाई केली आहे.

महाड, पोलादपूर तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची बैठक महाड पंचायत समितीच्या सभागृहामध्ये आयोजित करण्यात आली होती. या आढावा बैठकीला गैरहजर राहणारे वराठी ग्रामपंचायत अधिकारी मोतिसिंग लहानुजी भस्मे यांना रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी निलंबित केले. कारवाईचे कारण स्पष्ट करताना ते म्हणाले बैठकीला विनापरवानगी गैरहजर राहण्यासोबत भस्मे यांनी १५ वा वित्त आयोगाचा खर्च कमी करणे, प्रधानमंत्री आवास योजना कामात जाणून बुजुन दुर्लक्ष केल्याने ही कारवाई करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले.

मुख्यमंत्र्यांनी पान २ वर





# पुण्यात होणार तिसरे विश्व मराठी संमेलन

| पुणे | वृत्तसंस्था |

राज्य सरकारच्या मराठी भाषा विभागातर्फे आयोजित तिसरे विश्व मराठी संमेलन यंदा पुण्यात होणार आहे. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत हे संमेलन होणार असल्याची घोषणा मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी (दि.११) पत्रकार परिषदेत केली.

संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित राहणार आहेत. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिलेच विश्व मराठी संमेलन आहे. यापूर्वीची दोन संमेलने अनुक्रमे मुंबई आणि नवी मुंबई येथे झाली होती.

सामंत यांनी सांगितले की, आंतरराष्ट्रीय दर्जाचे लिखाण केलेल्या एका ज्येष्ठ साहित्यिकाचा आणि मराठी भाषेत कार्य करून आज लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचलेल्या एका तरुणाचा सन्मान करण्याच्या उपक्रमाची या संमेलनापासून सुरुवात करीत आहोत. या अंतर्गत यंदा ज्येष्ठ साहित्यिक मधू मंगेश कर्णिक आणि अभिनेते रितेश देशमुख यांचा गौरव करण्यात येईल. संमेलनात तरुण केंद्रस्थानी असतील.

संमेलनाबाबत पुण्यातील बहुतेक साहित्यिकांशी चर्चा झाली असून, त्यांच्या सूचना जाणून घेतल्या आहेत. त्यानुसार बालसाहित्यापासून संतसाहित्य आणि लोककलांपर्यंत प्रत्येक बाबीचा समावेश कार्यक्रमांत असेल. उद्घाटनाच्या दिवशी बालगंधर्व रंगमंदिरापासून फर्ग्युसन महाविद्यालयापर्यंत शोभायात्रा काढण्यात येईल. तरुण-ज्येष्ठ कवींचे काव्यसंमेलन, मराठी भाषेच्या अभिजात दर्जावरील चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद आदींचा समावेश संमेलनात असेल. याची सविस्तर कार्यक्रम पत्रिकाही लवकरच जाहीर करण्यात येईल, असेही सामंत यांनी नमूद केले.

परदेशातील लेखक, साहित्यप्रेमींना आमंत्रण गतवर्षी विश्व मराठी संमेलनात परदेशातील पान २ वर



# पनवेलमध्ये मराठा समाज आक्रमक



। पनवेल । वार्ताहर ।

कळंबोली पोलीस ठाण्यात येथे पनवेल मधील वंजारी समाजातील नेत्यांनी मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील व अंजली दमानिया यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी निवेदन दिले. याचा निषेध म्हणून पनवेल व कळंबोली परिसरात जातीयवाद पसरवणाऱ्या वंजारी समाजातील कार्यकर्त्यावर गुन्हे दाखल करून त्यांना समज द्यावा यासाठी शेकडो मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांची भेट घेवून त्यांना याबाबतचे निवेदन सुद्धा दिले आहे. तसेच कळंबोली पोलीस ठाण्यात निवेदन दिले.

बीड मधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे महाराष्ट्रातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. संतोष देशमुख यांना न्याय मिळावा यासाठी मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ वेगवेगळ्या ठिकाणी मोर्चे काढण्याचे काम चालू केले आहे. परभणीमधील मोर्चामध्ये जरांगे यांनी आरोपींवर तिखट शब्दात प्रहार केला. याबाबत पनवेल मधील वंजारी समाजाने जरांगे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे केवळ जाती प्रेमातून आरोपीना पाठीशी घालणाऱ्या काही समाज कंटक यांच्या कडून मनोज जरांगे व अंजली दमानिया यांच्या विरोधात खोटे गुन्हे दाखल करण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये दबाव टाकण्यात येत आहे. मनोज जरांगे आणि अंजली दमानिया यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी करणारे पनवेल येथे वंजारी विरुद्ध मराठा वाद निर्माण करायचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी पनवेल मध्ये जातीय तणाव निर्माण करून दोन समाजात तेढ निर्माण करून दंगल सदृश्य वातावरण निर्माण केले आहे.

पनवेल आणि परिसरामध्ये महाराष्ट्रासह देशाच्या कानाकोपऱ्यातून विविध जाती-धर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदत असताना बीडमध्ये घडलेल्या घटनेचा पनवेल येथे कुठलाही संबंध नसताना जाणीवपूर्वक पनवेलमधील वंजारी समाजाचे नेते पनवेलमधील सामाजिक सलोख्याचे वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे पनवेलमधील मराठा समाज आक्रमक झाला असून या ठिकाणी जातीवाद निर्माण करणाऱ्या नागरिकांना पोलीस प्रशासनाने कठोर कारवाई करून पनवेलमधील जातीय सलोखा राखावा, यासाठी शेकडो मराठा समाज बांधव व महिलांनी सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक रजपूत व कळंबोली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश कोते यांना निवेदन दिले.

त्याचप्रमाणे पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे, यावेळी पनवेलचे सकल मराठा समाजाचे नेते विनोद साबळे, संदीप जाधव, लिना गरड, स्वप्निल काटकर, तुषार सावंत, बापूराव ढेंबरे, किरण नागरगोजे, मंगेश शिंदे, स्नेहल बागल, रत्नमाला शिंदे, किरण नागरगोजे, स्वप्नील कालवर, संदीप जाधव, आभासो इंगळे, समीध फदाले, भरत अनुसया ज्ञानदेव जाधव, राजश्री कदम, त्रिवेणी जगताप, संगीता पवार, आतिष साबळे यांच्यासह मराठा समाजाचे शेकडो नागरिक उपस्थित होते.

# शेतकरी घरीच बनवू शकणार सेंद्रिय खते

## तळा कृषी विभागाकडून प्लास्टिक ड्रमचे वाटप



। तळा । वार्ताहर ।

रोवळा येथे डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत निविष्ठा निर्मितीसाठी १० जानेवारी रोजी श्रीराम शेतकरी गट व जय श्रीराम शेतकरी गट या गटातील शेतकऱ्यांना तळा कृषी विभागामार्फत जीवामृत,बिजामृत, दशपर्णी अर्क तयार करण्यासाठी २२५ लिटर आकाराच्या ड्रमचे वाटप करण्यात आले.

तळा तालुक्यामध्ये कृषी विभागाच्या माध्यमातून डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत शेतकरी गट तयार करण्यात आले आहेत या गटांच्या माध्यमातून नैसर्गिक व सेंद्रिय शेतीसाठी निवडलेल्या क्षेत्रात रासायनिक खते व किटकनाशकांचा वापर थांबवणे, जमिनिची सुपिकता व आरोग्य सुधारण्यासाठी व सेंद्रिय शेतमाल उत्पादीत व विक्री करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे त्यासाठी सेंद्रिय निविष्ठा जसे की जीवामृत, दशपर्णी अर्क, अमृत पाणी, पंचगव्या या निविष्ठा शेतकऱ्यांनी घरीच तयार कराव्यात यासाठी कृषी विभागाने गटातील सर्व शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे या योजनेचा एक भाग म्हणून सेंद्रिय निविष्ठा तयार करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्लास्टिक ड्रमचे वाटप कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना करण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आता सेंद्रिय निविष्ठा घरीच तयार करणे शक्य होणार आहे. सेंद्रिय निविष्ठा घरच्या घरीच तयार केल्यामुळे शेतीवरील खर्चाची बचत करणे शक्य होणार आहे. नैसर्गिक शेती मिशन योजनेचा लाभ मिळत असल्याने गटातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. ड्रम वाटपाच्या कार्यक्रमास तळा पंचायत समितीचे माजी उपसभापती गणेश वाघमारे, गोविंद पाशीमे, सचिन लोखंडे, विठोबा घाडगे व भागोजी शिगवण तसेच गावचे अध्यक्ष रामचंद्र म्हातले उपस्थित होते.

मंदार काणे एंटरटेनमेंटतर्फे आयोजित राष्ट्रीय पुरस्कार विजेते

# महेश काळे यांच्या कार्यक्रमाला प्रतिसाद




। पनवेल । वार्ताहर ।

मंदार काणे एंटरटेनमेंट तर्फे आयोजित फडके नाट्यगृह पनवेल येथे झालेल्या राष्ट्रीय पुरस्कार विजेते महेश काळे यांचा कार्यक्रम रसिक प्रेक्षकांच्या हाउसफुल्ल प्रतिसादात पार पडला.

त्याचप्रमाणे या कार्यक्रमाला वेळात वेळ काढून पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे, अतिरीक्त आयुक्त प्रशांत रसाळ, भाजपा आमदार विधानपरिषद विक्रांत बाळासाहेब पाटील, उपायुक्त वैभव विधाते सहप्रायोजक म्हणून कॉंग्रेस रायगड जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत, शिवसेना ज्येष्ठ नेते चंद्रशेखर सोमण माजी नगरसेवक तथा सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक तथा विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, माजी नगरसेवक तथा शिवसेना महानगरप्रमुख प्रथमेश चंद्रशेखर सोमण, कॉंग्रेस नेत्या श्रुती म्हात्रे, ॲडव्होकेट भारत नवाळे, उद्योजक विलास कोठारी, लोकमान्य मल्टिपरपज सोसायटी लिमिटेड पनवेल शाखेचे व्यवस्थापक न्यानेश मालवणकर, मार्केटिंग व्यवस्थापक सतीश सोनार या सर्व मान्यवरांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजक मंदार काणे एंटरटेनमेंटचे सर्वेसर्वा मंदार काणे आणि प्रिया इव्हेंट्सचे रसिक आंग्रे यांच्यातर्फे करण्यात आला या कार्यक्रमासाठी अभिषेक पटवर्धन ह्यांनी उत्तम प्रकारे निवेदन केले संपूर्ण कार्यक्रमाची फोटोग्राफी नारायण साटम यांनी केली उत्तम ध्वनी व्यवस्था देणारे सर्वेश गोखले, नाट्यगृह उपलब्ध करून दिल्याबद्दल पनवेल महानगरपालिका तसेच नाट्यगृह व्यवस्थापक राजेश डोंगरे, योगेश पाटील, मनोहर सावंत, रोहित गवते, मृण्मय काणे, प्रमोद काणे, सूचित मोहिते उपस्थित सर्व पत्रकार, मान्यवर मंडळीचे मंदार काणे एंटरटेनमेंट तर्फे आभार मानण्यात आले आहेत.

# विनातिकीट महिला प्रवाशाची महिला टीसीला मारहाण

। पनवेल । वार्ताहर ।

विनातिकीट रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिलेकडे तिकीटाबाबत विचारणा केल्याने संतप्त झालेल्या महिलेने, महिला टीसीचे केस पकडून मारहाण तिला बेदम मारहाण केल्याची घटना पनवेल रेल्वे स्थानकात घडली. सुषमा खेमका असे या महिला टीसीला मारहाण करणाऱ्या महिलेचे नाव आहे.

या प्रकरणातील ३८ वर्षीय तक्रारदार महिला तिकीट तपासणीस या पनवेल रेल्वे स्टेशन येथे वरिष्ठ तिकीट निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्या आणि त्यांच्या सहकारी तिकीट तपासणीस फलाट क्र.५ वर आलेल्या रोहा-दिवा मेमो रेल्वे गाडीतून उतरलेल्या प्रवाशांचे तिकीट तपासत होत्या. यावेळी महिला टीसीने २ महिलांकडे तिकीटाबाबत विचारणा केली असता, त्यातील आरोपी महिलेने तिच्याकडे तिकीट नसल्याचे सांगून तेथून पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे महिला टीसीने तिला अडवण्याचा प्रयत्न केला असता, सदर महिलेने महिला टीसीला शिवीगाळ करुन त्यांच्या हाताला नखाने ओरखडून त्यांना विरोध केला. त्यामुळे या महिला टीसीने इतर महिला टीसींच्या मदतीने सदर महिलेला टीसी ऑफिसमध्ये नेल्यानंतर तिने महिला टीसीला शिवीगाळ करुन त्यांचे केस पकडत त्यांना मारहाण करण्यास तसेच आरडा-ओरड करण्यास सुरुवात केली. त्यामुळे इतर महिला टीसींनी तेथे आरपीएफ जवानांना पाचारण केले. यावेळी आरपीएफच्या महिला जवानांनी महिलेला शांत करण्याचा प्रयत्न केल्यानंतरदेखील टीसी ऑफिसमधुन बाहेर येऊन टीसीचे केस पकडून मारहाण करत महिला टीसीच्या पोटामध्ये लाथ मारली. यावेळी आरपीएफने सदर महिलेच्या तावडीतून सुटका केल्यानंतर महिला टीसीने पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली.

# पळस्पे येथे रक्तदान शिबीर

। पनवेल । वार्ताहर ।

महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे येथे रस्ता सुरक्षा अभियान-२०२५ च्या अनुषंगाने रक्कदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पोलीस अधीक्षक, महामार्ग पोलीस, रायगड परिक्षेत्र, तानाजी चिखले, रासम, पोलीस उप अधीक्षक, रायगड परिक्षेत्र ज्योत्स्ना व पोलीस निरीक्षक भरत शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रभारी अधिकारी, महामार्ग पोलीस केंद्र, पळस्पे, वैभव रोंगे यांच्या नेतृत्वाखाली महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे येथे रोटरी क्लब ऑफ पनवेल सिटी यांचे सहकार्याने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरामध्ये महामार्ग सुरक्षा पोलीस पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार, आयआरबी स्टाफ, देवदूत स्टाफ व इतर नागरिक असे ४२ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले.



# स्मशानभूमी बांधकामाला चर्चेतून मार्ग सापडला

। रसायनी । वार्ताहर ।

मोहोपाडा ग्रामस्थांची जुनी स्मशानभूमी तोडून त्याजागी नवीन स्मशानभूमीचे बांधकाम सुरु झाले असताना नियमानुसार व नागरिकांच्या इच्छेप्रमाणे स्मशानभूमी बांधकाम होत नसल्याने परिसरातील ग्रामस्थांनी एकमुखी ठराव घेवून स्मशानभूमीचे बांधकाम बंद पाडले. यानिमित्ताने राकेश खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली मोहोपाडा, आळी आंबिवली व आसपासच्या परिसरातील ग्रामस्थांनी मोहोपाडा श्री दत्त मंदिरात चर्चा बैठक घेतली. यावेळी स्मशानभूमी बांधकाम कंत्राटदार रोहीत पाटील याला बोलावून ग्रामस्थांनी चर्चेअंती तोडगा काढला. यावेळी अगोदरील स्मशानभुमी एवढेच बांधकाम असावे, काम एकदाच होते, स्मशानभूमी जुना नाला बंद करुन त्यावर लाकडांसाठी छोटे रूम तयार करावे, स्मशानभूमीत पाणी व लाईटची योग्य व्यवस्था असावी. स्मशानभूमी आसपासच्या परिसरात नागरिकांना आसनव्यवस्था व वृक्षारोपण आदी विषय चर्चेत आले असता कंत्राटदार रोहीत पाटील याने होकार दिला. स्मशानभूमीचे काम पुन्हा सुरु करण्यात आले.यावेळी ग्रामस्थांनी मोहोपाडा स्मशानभुमी बांधकामांवर ग्रामस्थांच्यावतीने प्रतिनिधी निवडले जातील असे सांगितले.

# वाशी हवेली ग्रामस्थांनी दिला शिबिरार्थींना निरोप



। तळा । वार्ताहर ।

मुंबई विद्यापीठाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या द.ग.तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसीय विशेष हिवाळी निवासी श्रमदान शिबीर मौजे वाशी हवेली या गावात 'युथ फॉर माय भारत आणि डिजिटल लिटरसी ' या मध्यवर्ती संकल्पनेला अनुसरुन आयोजित केले होते.या शिबीराचा समारोप समारंभ १० जानेवारी २०२४ रोजी आयोजित केला होता.

या समारोप समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे संस्थेचे विश्वस्त मारोती शिर्के तर अध्यक्ष म्हणून संस्थेचे सन्माननीय उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे हे उपस्थित होते तसेच संस्थेचे सदस्य महादेव बैकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकाच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना विभागाने ग्रामस्थांसाठी हाती घेण्यात आलेले उपक्रम व त्या उपक्रमामध्ये गावकऱ्यांनी केलेली साथ यातुन हे शिबीर यशस्वीरित्या संपन्न झाल्याचा आनंद कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता कुंटेवाड यांनी व्यक्त केले, तर महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या हिवाळी निवासी श्रम दान शिबीरासाठी निवडलेले गाव अतिशय उत्तम असुन एक चांगले गाव मिळाल्याने प्राचार्य म्हणून मी निश्चिंत असल्याची भावना व्यक्त केली.

विश्वस्त शिर्के यांनी बेस्ट ग्रुप, प्राचार्य डॉ.नानासाहेब यादव यांनी बेस्ट स्वयंसेवक यांची घोषणा केली तर डॉ.कुंटेवाड यांनी एन.एस.एस.विशेष पुरस्काराची घोषणा केली. तेरा गाव कोळी समाज अध्यक्ष ज्ञानदेव तांडेल यांनी स्वयंसेवक व संस्था पदाधिकारी व कार्यक्रम अधिकारी यांनी शिबीर यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल अभिनंदन केले.

जगन्नाथ तांडेल यांनी सिमेवर लढणे म्हणजेच देश सेवा नाही तर आपल्या घरच्या कचऱ्याचे आपण व्यवस्थापण करणे हिच देशसेवा आहे आणि ती आमच्या गावात स्वयंसेवकांनी केल्या बद्दल धन्यवाद दिले तर मंचावर उपस्थित ग्रामस्थ अध्यक्ष भांजी मेंदाडकर यांनी स्वयंसेवक शिबीर संपवून आज घरी जात असल्याबद्दल खंत व्यक्त केली.

# यात्रा तोंडावर, खड्डे जोरावर



। नेरळ । वार्ताहर ।

प्रसिद्ध असेलेली म्हसा यात्रा दोन दिवसात सुरु होत असून लाखो भाविक कर्जत मुरबाड रस्त्यावरून प्रवास करत असतात. परंतु यावर्षी या रस्त्यावर पोही-कळंब गावाजवळ मोठं मोठे खड्डे पडल्याने अपघाताची भीती निर्माण झाली आहे. या रस्त्यावरील खड्डे लवकरात लवकर भरावे अशी मागणी परिसरातील नागरील आणि भाविकांमधून होत आहे.

मुरबाड या ५४८ ए या राज्यमार्गाला राष्ट्रीय राज्यमार्गाचा दर्जा प्राप्त झाला असुन, या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटचे व रुंदीकरणाचे काम हे एमएसआरडीसी विभागाच्या अंतर्गत व देखरेखीखाली अनेक वर्षापासुन सुरू आहे. मात्र ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे व एमएसआरडीसी विभागाच्या बेजबाबदार पणामुळे कर्जत-मुरबाड राष्ट्रीय राज्यमार्ग अद्याप अपूर्ण आहे.

कर्जत- मुरबाड या राष्ट्रीय राज्य मार्गवर रात्रंदिवस मोठया प्रमाणात वाहनांची वर्दळ होणार असल्याने आपघाता व जिवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही, एमएसआरडीसी विभाग व ठेकेदार अपघात होऊन जिवितहानी होण्याची वाट पाहत आहे का? असा प्रश्न मात्र सामान्य नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

तर कर्जत - मुरबाड मार्गावर या आधी ही अपघातामध्ये काही वाहनचालकांना आपला जीव गमवावा लागल्याच्या घटना घडल्या आहेत.

> **१३ तारखेला म्हसोबाची यात्रा येत आहे. कर्जत मुरबाड रस्ता पोई फाटे ते कळंब सरकारी दवाखानापर्यंत रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते अशी स्थिती असल्याने, म्हसा यात्रेला येणारे यात्रेकरू यांना रात्रीच्या वेळेस खड्डा न दिसल्यामुळे त्यांच्या वाहनाना मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने, याकडे संबधित विभागाचे अधिकारीवर्ग व ठेकेदार दुर्लक्ष करीत असल्याने,एखादी दुर्घटना झाल्यावर त्यांचे डोळे उघडतील का?**
> **- धोंडू राणे, सामाजिक कार्यकर्ते तथा पोशिर गावचे ग्रामस्थ.**

> **आमच्या विभागाकडून संबधित ठेकेदाराला रस्त्यावरील पडलेले खड्डे भरण्यासाठी नोटीस बजविण्यात आली आहे. सदर बाब ही आमच्या लक्षात आणून दिल्याने आम्ही ठेकेदाराकडून सदर रस्त्यावरील खड्डे तातडीने भरण्यासाठीच्या सूचना करून, सदर खड्डे ठेकेदाराकडून लवकरात लवकर भरूण घेऊ.**
> **:- संदीप पाटील, कार्यकारी अभियंता,एमएसआरडीसी विभाग,**

## पान १ वरून

### तीन प्रयोगशाळांत 'एचएमपीव्ही' चाचणी

काही रुग्ण आढळले होते. त्यानंतर जगातील बहुतांश सर्वच भागांत त्याचा प्रसार आढळला आहे. सामान्यतः या विषाणूंमुळे सौम्य श्वसन आजार उद्भवतात. मात्र, रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत असलेल्या गटांतील अशा काही व्यक्तींना गंभीर आजार होऊ शकतो. आतापर्यंत हा विषाणू अनुवांशिकदृष्ट्या तुलनेने स्थिर आहे, असे स्पष्टीकरण दिले आहे. प्रतिबंधात्मक उपायांमध्ये हात धुणे, खोकल्याचे शिष्टाचार पाळणे, संसर्ग झालेला पृष्ठभाग स्वच्छ करणे आणि संक्रमित व्यक्तींशी संपर्क टाळणे, या उपाययोजनाही सुचविल्या आहेत. याबाबतचा आदेश राज्याच्या आरोग्य विभागाचे सचिव निपुण विनायक यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना व इतर प्रशासकीय अधिकाऱ्यांना शुक्रवारी जारी केले.

### वराठी ग्रामपंचायत अधिकारी निलंबित

जनतेला सोयी सुविधा मिळाव्यात या अनुषंगाने १०० दिवसांचा महत्वाकांक्षी उपक्रम जाहीर केला आहे. या उपक्रमाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, प्रत्येक तालुकानिहाय आढावा घेण्यात येत आहे. तसेच कामचुकार करणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात कारवाई करण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत शंभर दिवसांत नागरिकांच्या सोयीसुविधा, प्रशासनातील सुधारणा या बाबींवर भर दिला जात आहे. या उपक्रमांतर्गत शुक्रवारी (दि.१०) महाड, पोलादपुर तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी यांची आढावा सभा घेण्यात आली. सदर सभेमध्ये प्रधानमंत्री आवास योजना, १५वा वित्त आयोग १०० टक्के खर्च करणे, स्वच्छ भारत अभियानांतर्गत करण्यात आलेली कामे यांचा आढावा घेण्यात आला. यावेळी १०० दिवसांचा महत्वाकांक्षी कार्यक्रम विहीत वेळेपूर्वी यशस्वी करणे व त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचना डॉ. भरत बास्टेवाड यांनी उपस्थित ग्रामपंचायत अधिकारी यांना दिल्या.

या आढावा सभेस जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम, महाडच्या गटविकास अधिकारी डॉ. स्मिता पाटील, पोलादपुरच्या गटविकास अधिकारी दिप्ती गाट, सहाय्यक गटविकास अधिकारी नामदेव आण्णा कटरे तसेच सर्व विस्तार अधिकारी, शाखा अभियंता उपस्थित होते.

### पाली बसस्थानकाची रखडपट्टी

महामंडळ अथवा कंत्राटदाराकडून तेथे कोणत्याही स्वरूपाचे काम सुरू करण्यात आलेले नाही. जुन्या इमारतीचे डेब्रिज व राडारोडा स्थानकात तसाच पडला आहे. स्थानकातील नाल्याचा एका बाजूचा स्लॅब दुरुस्त करून तेथून अजूनही वाहतूक सुरु झालेली नाही. त्यामुळे बस एका बाजूनेच जातात व येतात त्यामुळे गाड्यांना ये-जा करण्यास अडथळा होतो. स्थानक आवारात पालीतील नाले व गटारांतील सांडपाणी येते. त्यामुळे येथे खूप दुर्गंधी पसरली आहे. स्थानकात मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. प्रवाशांसाठी पिण्यासाठी चांगले पाणी देखील नाही. यामुळे स्थानिक नागरिक व प्रवाशांमध्ये प्रचंड संताप आहे.

स्थानकाचे नूतनीकरण व येथील समस्या मार्गी लावण्यासाठी अनेकदा उपोषण केले आहे. याबाबत सातत्याने वरिष्ठ स्तरावरून अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन व निवेदन देऊन पाठपुरावा करत आहे. मात्र अद्यापही कोणतीही उपाययोजना व ठोस कारवाई झाली नाही. त्यामुळे या प्रश्नांवर पुन्हा उपोषणाला बसणार आहे, असे रवींद्रनाथ ओव्हाळ यांनी सांगितले.

**वाढीव निधी अपेक्षित**

नवीन प्रस्ताव व आत्ताच्या बाजार भावाप्रमाणे हा निधी वाढण्याची शक्यता आहे. साधारणतः १२ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. यामध्ये नवीन सुसज्ज भव्य इमारतीसह विविध सुविधा आदींचा समावेश आहे.

**आणखी उशीर**

नवीन प्रस्तावास मान्यता मिळणे त्यानंतर निविदा काढणे नवीन ठेकेदार नेमणे या सर्व प्रक्रियेला आणखी उशीर होईल. आणि ही प्रक्रिया पूर्ण झाल्यावर प्रत्यक्षात स्थानक पुनर्बांधणी काम पूर्ण होण्यास अधिक कालावधी जाण्याची शक्यता आहे.

**दुर्गंधी आणि गैरसोय**

स्थानकाला संरक्षक भिंत नाही. जुन्या इमारतीचा राडारोडा तिथेच बस स्थानकात खड्डे पडले आहेत. बस स्थानकाच्या आवारात पालीतील सांडपाणी येते. व हे दूषित पाणी साचून दुर्गंधी व घाण पसरली आहे. स्थानकाच्या बाजूने प्रचंड झाडेझुडपे वाढली आहेत. तसेच पाली बस स्थानक हे खाजगी वाहनांचे पार्किंगचे ठिकाण बनले आहे. शिवाय निवारा शेड अपूर्ण पडत आहे.

### पोकलेन अंगावर पडून चालकाचा मृत्यू

सोनारी फाटा येथील जासईकडे जाणाऱ्या ब्रिजलगत सुरू असलेल्या रेल्वेच्या साइटवर पोकलेनचे काम असल्याने त्या ठिकाणी ट्रेलरवरून पोकलेन नेण्यात आला होता. यावेळी अजयकुमार हा ट्रेलरवरून पोकलेन खाली उतरवत असताना पोकलेनवरील त्याचे नियंत्रण सुटले. त्यामुळे पोकलेन ट्रेलरवरून खाली पडणार याची अजयकुमार याला चाहूल लागताच त्याने पोकलेनमधून खाली उडी मारली; मात्र याचवेळी ट्रेलरवरील पोकलेन अजयकुमार याच्या अंगावर पडल्याने त्याच्याखाली चिरडला जाऊन त्याचा जागीच मृत्यू झाला. न्हावा-शेवा पोलिसांनी याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली.

### पुण्यात होणार तिसरे विश्व मराठी संमेलन

मराठी व्यक्तींना संमेलनात बोलावण्यासाठी वारेमाप खर्च करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर यंदाच्या संमेलनात परदेशस्थ मराठी व्यक्तींच्या सहभागाबाबत सामंत म्हणाले, या व्यक्ती परदेशात राहत असल्या तरी आपल्या महाराष्ट्राच्याच आहेत. त्यांना संमेलनात सहभागी होता यावे, म्हणून गतवेळी प्रवासाचा खर्च देण्यात आला होता. यंदाही जगभरातील मराठी भाषिकांनी सहभागी व्हावे, असा आमचा प्रयत्न असेल.

# पत्रकाराच्या तत्परतेमुळे सापडलेला मोबाईल मूळ मालकाच्या स्वाधीन

। पनवेल । वार्ताहर ।

पत्रकाराच्या तत्परतेमुळे सापडलेला मोबाईल मूळ मालकाला पोलिसांच्या माध्यमातून स्वाधीन करण्यात आले आहे. युवा ग्रामीण पत्रकार संघाचे पनवेल तालुका आघाडी अध्यक्ष जतिन शेट्टी यांना घनसोली ते पनवेल या दरम्यान लोकल ट्रेनने प्रवास करत असताना मोबाईल फोन सापडला. त्यावेळी पनवेल लोहमार्ग पोलीस ठाण्यात जितिन शेट्टी यांनी पोलिसांच्या स्वाधीन केला.



पोलिसांनी मोबाईल मालकाला सोडून काढून तो मोबाईल पुन्हा मूळ मालकाला स्वाधीन केला. पत्रकाराच्या तत्परतेमुळे हरविलेला मोबाईल मूळ मालकाच्या हाती स्वाधीन झाल्यानंतर प्रशासनाकडून जितीन शेट्टी यांचे कौतुक केले आहे.

# बांगलादेशी नागरिकावर कारवाई

**पनवेल** : कळंबोली पोलिसांनी बांगलादेशी नागरिकावर कारवाई करत त्याला अटक केली. सफायत सत्तर मोहम्मद शेख असे त्याचे नाव आहे. कळंबोली गाव येथे बांगलादेशी नागरिक येजा करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार सफायत सत्तर मोहम्मद शेख याला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याने गरिबीला आणि उपासमारीला कंटाळून पोट भरण्यासाठी भारतात बेकायदेशीर प्रवेश केल्याचे सांगितले.

# दिव्यांगासाठी उद्योजकता जागृती कार्यक्रम



| अलिबाग | प्रतिनिधी |

दिव्यांगाना आर्थिक बळ मिळावे, यासाठी अलिबागमध्ये दिव्यांगासाठी उद्योजकता जागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय उद्योजकता विकास संस्था, अहमदाबाद आणि टाटा कम्युनिकेशन मुबई यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबागमधील जिल्हा उद्योग केंद्र सभागृहात शुक्रवारी (दि.१०) हा कार्यक्रम घेण्यात आला होता.

या कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून जिल्हा उद्योग केंद्र व्यवस्थापक इंद्रायणी लोटणकर, खादी ग्रामोद्योग मंडळाचे वंजारी तसेच दिव्यांग क्रांती संघटना व दिव्यांग उत्कर्ष सामाजिक संस्थेचे अध्यक्ष बी.जी. पाटील, प्रकल्प अधिकारी गौरव काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात प्रकल्प अधिकारी शशिकांत दानोरीकर यांनी दिव्यांगांना उद्योजकता विकास प्रशिक्षणाबाबत सविस्तर माहिती दिली. मार्गदर्शन करताना इंद्रायणी लोटणकर यांनी जिल्हा उद्योग केंद्र मार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली.या जागृती कार्यक्रमात अलिबाग तालुक्यातील ५७ हून अधिक दिव्यांगांनी सहभाग घेतला होता.

## सखाराम पवार यांचे गौरवोद्गार

# कर्मचारी संघटनेची उज्ज्वल परंपरा कायम

| अलिबाग | प्रतिनिधी |

जिल्हा परिषदेमध्ये सेवा देऊन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे आजही अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीने शासन दरबारी न्याय मागण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. रायगड जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेला एक उज्ज्वल परंपरा आहे. ही परंपरा आजही या संघटनने कायम ठेवली आहे. याचे उदाहरण आजचा जिल्हा मेळावा आहे, असे गौरवोद्गार संघटनेचे जिल्हा शाखेचे माजी अध्यक्ष सखाराम पवार यांनी काढले आहेत.

रायगड जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचारी संघटना रायगडचा जिल्हा मेळावा कुरूळ येथील क्षात्रैक्य समाज हॉल येथे बुधवारी (दि.८) आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते.



यावेळी क्षात्रैक्य समाज अलिबागचे अध्यक्ष तथा रा.जि.प.चे माजी सदस्य द्वारकानाथ नाईक, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी महादेव टेले, लेखाधिकारी सतीश भोळवे, रा.जि.प. सेवानिवृत्त कर्मचारी संघटना अध्यक्ष जी.एच. पाटील, उपाध्यक्ष अजित जाधव, डी.जी. मानकर, सचिव सुरेश म्हात्रे, खजिनदार किशोर घरत, सदानंद शिर्के, रा.जि.प. कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष डॉ. कैलास चौलकर, माजी अध्यक्ष प्रकाश म्हात्रे, डॉ. राजू म्हात्रे, न. मो. घरत, आय.के. दळवी, ए.बी. पाटील, मदन मोरे, नामदेव शिंदे, प्रकाश म्हात्रे, डॉ. रवींद्र पाटील, सुचिता पाटील, सुनील पाटील, सदानंद शेळके, नाट्यचित्रपट अभिनेते शरद कोरडे, कोकणनामाचे संपादक उमाजी केळुसकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी क्षात्रैक्य समाज अलिबागचे अध्यक्ष द्वारकानाथ नाईक यांनी सांगितले की, रायगडचे भाग्य विधाते प्रभाकर पाटील अध्यक्ष असताना निवृत्तीच्या वेळी पेन्शनची ऑर्डर हातात ठेवली जायची. ही प्रथा नंतर बंद पडली. आता संगणक युगात ही सोय झाली पाहिजे, अशी मागणी यावेळी नाईक यांनी केली आहे.

### सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मान

**रा.जि.प.च्या सेवानिवृत्त ८० वर्ष व त्यापुढील वयोगटातील कर्मचारी सखाराम पवार, द्वारकानाथ नाईक, दत्तात्रय मुकादम, सदानंद इकर, श्रीकांत पाटील, दोडाचार्य व्यंकटाचार्य, नारायण भगत, रमेश वाकडे, आत्माराम पाटील, कुसूम पाटील, शरद गडेकर, हरिश्चंद्र पाटील, वामन बने, रामचंद्र डाके, तुळशीराम मोरजकर,कृष्णकांत मोरजकर, साधा फाटक, गोविंद पवार, पांडुरंग राऊळ, शशीकांत पाटील, बाबुराव देशमुख, अशोक सावंत, तुकाराम म्हात्रे, नारायण म्हात्रे, प्रकाश लोखंडे, विश्वनाथ पाटील, रामचंद्र लाड, शिवाजी खानविलकर या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.**

### निमंत्रित अधिकाऱ्यांची गैरहजेरी

**या मेळाव्याला जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजीत बडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहूल कदम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जालिंदर पठारे, ग्रामपंचायत विभागातील उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव यांना प्रमुख पाहूणे निमंत्रित करण्यात आले होते. परंतु, या कार्यक्रमाला त्यांनी गैरहजेरी लावली. मान्यवर उपस्थित न राहिल्याने सेवानिवृत्त कर्मचारी वर्गात नाराजीचे सुर उमटले. अनेकांनी अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीबाबत नाराजी व्यक्त केली आहे.**

# अलिबाग समुद्रकिनारी होणार लायन्स फेस्टिवल

## स्थानिक व्यावसायिकांसह बाहेरील उद्योजकांचे असणार स्टॉल

| अलिबाग | प्रतिनिधी |

स्थानिक व्यवसायिकांसह बाहेरील व्यवसायिकांना उद्योग वाढीसाठी चालना मिळावी. त्यांना आर्थिक बळ मिळावे यासाठी अलिबाग समुद्रकिनारी लायन्स फेस्टिवल भरविण्यात येणार आहे. २३ ते २७ जानेवारी या कालावधीत हे फेस्टीवल असणार आहे. खाद्य पदार्थांसह वेगवेगळ्या वस्तू प्रदर्शन व खरेदीबरोबरच वेगवेगळ्या कार्यक्रमांचा आनंद नागरिकांना घेता येणार आहे. या लायन्स क्लब फेस्टिवलने १८ वर्षाची परंपरा जपली आहे.

हँगर पद्धतीचे विस्तीर्ण दालन, सायमा पद्धतीचे अत्याधुनिक स्टॉल, जागतिक बाजारपेठेतील नामांकित ब्रँन्ड असलेल्या मीनल मोहाडीकर यांच्या कंझ्युमर शॉपी या संस्थेबरोबरील सहकार्याने या महोत्सवात पावणे दोनशेहून अधिक स्टॉल ग्राहकांच्या सेवेसाठी असणार आहेत. व्हेज, नॉनव्हेज बरोबरच वेगवेगळे खाद्य पदार्थांचे ५०हून अधिक स्टॉल खवय्यांसाठी पर्वणी ठरणार आहेत. मान्यता प्राप्त सोने, चांदी, हिरे, नामांकित ज्वेलर्स, नामांकित चारचाकी व दुचाकी वाहनांचे प्रदर्शन व विक्री या फेस्टीवलमध्ये असणार आहेत.

या फेस्टीवलचा शुभारंभ गुरुवारी (दि.२३) सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, जिल्हाधिकारी किशन जावळे, लायन्स क्लबचे पदाधिकारी यांची उपस्थिती असणार आहे. या




पहिल्या दिवशी सांस्कृतिक सोहळा म्हणून कराओके स्पर्धा घेतली जाणार आहे. शुक्रवारी (दि.२४) सायंकाळी शरीर सौष्ठव स्पर्धा, पेट शो कार्यक्रम होणार आहे. शनिवारी (दि.२५) सायंकाळी बौद्धिक क्षमता विकसित करणारा अलिबाग लायन्स टॅलेंट हंट कार्यक्रम होणार आहे. रविवारी (दि.२६) इंडियन आयडॉल नामांकित अभिनेत्री श्वेता दांडेकर संगीत रजनी आणि, सोमवारी (दि.२७) 'इंडि-सा' हिंदी बँड असे अनेक मनोरंजनाचे कार्यक्रम या महोत्सवाची शान वाढवणार आहेत. लायन्स हेल्थ फाउंडेशनच्या माध्यमातून नेत्रचिकित्सा, नेत्रदान, अवयवदान, देहदान यांचा प्रचार आणि प्रसाराचे कामही महोत्सवादरम्यान करण्यात येणार आहे.

या महोत्सवात रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक पुरस्कृत दहाहून अधिक महिला बचत गटांचे स्टॉल, जिल्हा रुग्णालयामार्फत नेत्रदान स्टॉल व पथनाट्य होणार आहे. या महोत्सवाच्या दरम्यान शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख तथा पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, अलिबागच्या माजी उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, ॲड. प्रवीण ठाकूर, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, अलिबाग नगरपरिषद मुख्याधिकारी आणि वेगवेगळ्या क्षेत्रातील सर्व अधिकारी आदी मान्यवर महोत्सवादरम्यान भेट देणार आहेत. ग्राहक आणि परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून हा फेस्टिवल यशस्वी करावा, असे आवाहन अलिबाग लायन्स क्लबच्या अध्यक्ष ॲड. गौरी म्हात्रे आणि फेस्टिवल समितीचे अध्यक्ष नयन कवळे व सर्व पदाधिकारी सदस्यांनी केले.

# पर्यटकाकडून रस्त्यावर कचरा

**नेरळ :** कर्जत हे पर्यटन केंद्र बनले असून सुट्टीच्या दिवशी आपल्या फार्म हाऊस तसेच रिसॉर्टवर पर्यटकांची मांदियाळी असते. मात्र, तेच पर्यटक आपल्या घरी परतत असताना कचरा भरून आणलेल्या पिशव्या तालुक्यातील रस्त्याच्या कडेला टाकून देत असल्याचे सातत्याने दिसून येत आहे. दरम्यान, दहिवली येथे एका व्यक्तीने आपल्या गाडीच्या डिकीतून पिशव्यांमध्ये भरुन आणलेला कचरा रस्त्याच्या बाजूलाच टाकला. यावेळी, स्थानिकांनी त्या व्यक्तीला रस्त्याच्या बाजूला कचरा टाकण्याचा मज्जाव केला. त्यानंतर त्या तरुणांनी त्या व्यक्तीचा कचरा टाकत असतानाचा फोटो काढायला सुरुवात केली असतर रस्त्याच्या बाजुला फेकलेल्या कचऱ्याच्या पिशव्या पुन्हा गाडीत ठेवायला सांगितल्या.

# मटका जुगार अड्ड्यावर छापा

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील रांजणपाडा येथे एका दुकानात बेकायदेशीर मटका जुगार अड्डा राजरोसपणे सुरू होता. मांडवा सागरी पोलिसांनी या अड्ड्यावर शुक्रवारी (दि.१०) सायंकाळी छापा टाकला. या छाप्यात मुद्देमाल जप्त करण्यात आला असून मटका व्यवसाय चालविणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. मांडवा सागरी पोलिसांच्या या कारवाईचा दणका अवैध व्यवसायिकाला मिळाला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, रांजणपाडा परिसरात असलेल्या एका दुकानामध्ये अवैधरित्या मटका जुगार चालू असल्याची माहिती मांडवा सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक भोई यांना मिळाली. माहिती घेऊन पडताळणी करण्यात आली. त्यानंतर शुक्रवारी सायंकाळी त्यांच्या मार्गदर्शनाखाली छापा टाकण्यात आला. यावेळी, रोख रकमेसह अन्य ऐवज पोलिसांनी जप्त केला आहे. याप्रकरणी अजित पाटील यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त मेन नावाचा बेकायदा मटका जुगार सुरु होता. याबाबत पोलीस शिपाई जयेश पाटील यांनी फिर्याद दिली आहे.

स्वतःच्या फायद्यासाठी दुसऱ्याकडून पैसे स्विकारून हा धंदा चालवित होता. पोलिसांनी या अड्ड्यावर कारवाई केल्याने अवैध धंद्यावर अंकुश बसण्याची शक्यता वर्तविली जात आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार आर. एन. शिद करीत आहेत.



# उरणमध्ये पाणी प्रश्न गंभीर

## आमदार महेश बालदी यांचे दुर्लक्ष; ग्रामस्थांचा आरोप

। उरण । वार्ताहर ।

**जल जीवन मिशन अंतर्गत 'हर घर जल' या संकल्पनेखाली केंद्र सरकारने २०२४ पर्यंत देशातील सर्व ग्रामीण भागात राहणाऱ्या कुटुंबांना नळ योजनेद्वारे पुरेसे व सुरक्षित पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी जल जीवन मिशन सुरू केले होते. मात्र, उरण तालुक्यातील खोपटे गावांमध्ये मात्र हे काम ठेकेदाराच्या हलगर्जीपणामूळे संथ गतीने होत आहे. त्यामुळे मुख्य जलवाहिनीचे काम अपूर्ण असल्याने खोपटे गावात पाणी टंचाई सुरू आहे. त्यामुळे, मुख्य पाईप लाईनचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी खोपटे ग्रामस्थ करीत आहेत.**

उरण तालुक्यातील खोपटे गावात जलजीवन मिशन अंतर्गत 'हर घर जल' या योजनेच्या कामात कंत्राटदाराच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात चालढकल करण्यात येत आहे. जलजीवन मिशन अंतर्गत खोपटे ते चिरनेर गावापर्यंत अपूर्ण असलेल्या पाईप लाईनचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी मागणी खोपटे गावातील ग्रामस्थ करत आहेत. हे काम पूर्ण न झाल्यामुळे खोपटे गावात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अतिशय गंभीर झाला आहे. सातपाड्यांनी वसलेल्या या गावात जवळपास एक दिवसाआड एक तासासाठी पाणी येत आहे. त्यामुळे या गावात पाणीटंचाई पाचवीलाच पुजलेली आहे, असे गुहिणींकडून संबोधित केले जात आहे.



२०२१ ते २०२२ रोजी जलजीवन मिशन अंतर्गत खोपटे ते चिरनेर या पाईप लाईनला मुख्य हेटवणे धरणाच्या पाईप लाईनला जोडण्याचे काम मंजूर झाले होते. मे २०२३ रोजी या जलजीवन मिशन अंतर्गत मुख्य पाईपलाईनच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली होती. मात्र, संबंधित प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अजूनही हे काम पूर्ण झालेले नाही. कंत्राटदार देखील हे काम पूर्ण करण्यास कोणत्याही प्रकारचे स्वारस्व दाखवत नसल्याचे निर्दशनास येत आहे. त्यामुळे गावात पाणीटंचाईची समस्या डोके वर काढत आहे. यासंदर्भात लोकप्रतिनिधी आणि आमदार महेश बालदी हे आवाज उठवित नसल्याचे सध्या खोपटा गावातील ग्रामस्थांकडून सांगण्यात येत आहे.

# उपोषणादरम्यान विद्यार्थ्यांना सेवा द्या

## सेंट झेवीयर्सच्या मुख्याध्यापिकेची मागणी

। माथेरान । वार्ताहर ।

सद्यस्थितीत माथेरानमध्ये एकूण ९४ हातरीक्षा चालकांपैकी केवळ २० ई-रिक्षा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे उर्वरित ७४ हात रिक्षा चालकांना सुध्दा ई-रिक्षाची परवानगी मिळावी यासाठी श्रमिक रिक्षा संघटना मंगळवार दि. १४ जानेवारी पासून हातरिक्षा व ई-रिक्षा बंद ठेवून बेमुदत उपोषण करणार आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना ई-रिक्षाची सेवा सुरू ठेवण्यात यावी, अशी मागणी सेंट झेवीयर्स शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर फिलोजेम्स यांनी सनियंत्रण समितीचे अध्यक्ष के.पी. बक्षी यांच्याकडे केली आहे.

सेंटझेवीयर्सशाळाहीगावापासून ५ किलोमीटर दूरवर आहे. अगदी केजी पासून दहावीपर्यंत विद्यार्थी शाळेत येत असतात. ई-रिक्षाची सेवा विद्यार्थ्यांना खूपच सोयीस्कर आहे. नियमितपणे २७४ विद्यार्थी व



२२ शिक्षक या सेवेचा लाभ घेतात. मात्र, १५ ई-रिक्षांमधून ही सेवा देण्यासाठी कमी पडत असून ई-रिक्षाची संख्या वाढवण्याची गरज असल्याचे मत सिस्टर फिलोजेम्स यांनी व्यक्त केले आहे. तसेच, श्रमिक रिक्षा संघटनेसोबत चर्चा करून मार्ग काढावा, अशी विनंती अध्यक्ष के.पी. बक्षी यांच्याकडे करण्यात आली आहे.


ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


# चिमुरडीच्या न्यायासाठी रोहेकर रस्त्यावर

## नराधमाला फाशी देण्याची मागणी

। रोहा । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील वरसे येथील एका नराधमाने ११ वर्षीय चिमुरडीवर अतिप्रसंग केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. पीडित मुलीला न्याय मिळवून देण्यासाठी तसेच या कठीण प्रसंगी अल्पवयीन मुलीला व तीच्या कुटुंबियांना धीर देण्यासाठी रोहेकरांनी शुक्रवारी (दि.१०) सायंकाळी रस्त्यावर उतरून मूक मोर्चाद्वारे आपला संताप व्यक्त केला.सद्यास्थित महिला, तरुणी व अल्पवयीन सूरक्षित नाही. असे संपातजनक प्रकार थोपविण्यासाठी शासनाला अपयश आले आहे. या वृतीला पोलीस प्रशासनाने ठेचून काढले पाहिजे. म्हणून या नराधमाला भरचौकात फाशी द्या, अशी मागणी संतप्त महिलांनी केली.



वरसे येथील एका अल्पवयीन चिमुरडीवर नात्याने काका असलेल्या व वासनेने पछाडलेल्या तेजस पडवळ या आरोपीने लैंगिक आत्याचर केल्याची घटना घडल्याने सर्वत्र संतापाची लाट पसरली आहे. संतप्त ग्रामस्थांनी मोर्चा काढल्यानंतर पोलिस यंत्रणा कामाला लागली आणि तात्काळ आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या. या निंदनीय घटनेचा निषेध आणि पीडित मुलीला व तिच्या कुटुंबियांना न्याय मिळावा त्याचप्रमाणे आरोपीला भरचौकात फाशी द्यावी, या मागणीसाठी शुक्रवारी वरसे नाक्यापासून दमखाडी नाका, रोहा शहर ते तहसीलदार कार्यालयापर्यंत मूक मोर्च्याचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्च्यात शेकडोच्या संख्याने रोहेकर नागरिक उपस्थित होते. विशेषतः महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित असल्याने प्रशासनाची तारांबळ उडाली होती.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची बिनशेती प्लॉट मिळकत तिचे मालक एक्सपॅट प्रॉपर्टीज इंडिया लि. यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे नालधे तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील बिनशेती प्लॉट मिळकत**

| भुमापन क्र व उपविभाग/प्लॉट क्रमांक | एकुण क्षेत्र | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ७९/२७३ | २-८८-०० आर चौ मीटर म्हणजेच २८८ चौ मीटर | २८-८० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०३/०१/२०२५

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यांत येते की, आमचे आशिल यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे विद्यमान मालक संजय काशिनाथ धुमाळ वगैरे ५, रा. बार्णे, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

**मौजे बार्णे, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर. चौ.मी) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ११ | १/अ | ०-८१-६० पो.ख. ०-६-३० | ७३० |
| | | ०-८७-९० पैकी ५० गुंठे इतके क्षेत्र | |

सदरची मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील लहान मोठी झाडे तद्गभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशीलांस विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटॅचमेंट, लिएन वगैर अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा करार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.
कळावे.

दिनांक : १२/०१/२०२५

अशिलां तर्फे ॲडव्होकेट
**ॲड. प्रविण गजानन चव्हाण**
मु. डिकसळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ८२३७१०१७१८

# कृष्णकांत भोईर यांना पत्नी शोक

। पाली । वर्ताहर ।



सुधागड तालुक्यातील राबगाव येथील राष्ट्रीय कीर्तनकार कृष्णकांत भोईर यांच्या पत्नी भावना भोईर यांचे निधन झाले आहे. मृत्यू समयी त्या ७० वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सून नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या मृत्युने राबगाव गावावर शोककळा पसरली आहे. त्यांचे दशक्रिया विधी बुधवारी (दि.१५) शिवाजी पार्क दादर मुंबई येथे होणार आहेत. तर, उत्तरकार्य शुक्रवारी (दि.१७) शिवडी येथील म्हाडा कॉलनी येथे होणार आहेत.



**रायगड जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांचे आंदोषीचे नवनियुक्त केंद्र प्रमुख कृष्णकुमार शेळके यांच्याकडून स्वागत करताना..**



# पाण्यासाठी महिलांचा मोर्चाचा इशारा

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ येथील फणसवाडी परिसरात पिण्याचे पाणी अंत्यत कमी दाबाने येत आहे. त्यामुळे या भागातील महिलांनी नोव्हेंबरमध्ये नेरळ ग्रामपंचायतीकडे निवेदन देऊन पाणी पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली होती. मात्र, नेरळ ग्राम पंचायत प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही होत नसल्याने अखेर महिलांनी मोर्चा करण्याचा इशारा दिला आहे.

फणसवाडी या भागात मोठ्या प्रमाणात चाळी उभ्या राहिल्या असून तेथील लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे. त्याचा परिणाम पाणी पुरवठ्यावर झाला असून स्थानिक रहिवाशी आणि ग्रामस्थांना अत्यंत कमी दाबाने पाणी मिळत आहे. त्यात त्या भागातील सार्वजनिक पाणी पुरवठा वितरण ठिकाणी पाणी भरण्यासाठी आलेल्या महिलांमध्ये दररोज वाद होत असतात. त्यामुळे या भागातील महिलांनी एकत्र येत नेरळ ग्रामपंचायतीत येऊन ग्रामपंचायत अधिकारी अरुण कार्ले यांना नोव्हेंबर महिन्यात निवेदन देऊन पाणी समस्या सोडविण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, त्यावर नेरळ ग्रामपंचायत प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. त्यात दररोज चार-पाच हांडे भरतील एवढेच पाणी मिळत असल्याने ग्रामस्थ नाराज आहेत. नेरळ ग्रामपंचायत दुर्लक्ष करीत असल्याची भावना स्थानिक रहिवाशी यांच्यात आहे.

# संतोष मेथा यांना मातृशोक

। माणगाव । प्रतिनिधी ।



माणगाव येथील प्रतिष्ठित व्यापारी व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संतोष मेथा व मंगेश मेथा यांच्या मातोश्री मधुकांता गोविंद मेथा यांचे शुक्रवारी (दि.१०) निधन झाले. मृत्यूसमई त्यांचे वय ७६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्च्यात दोन मुलगे, दोन सुना, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने मेथा कुटुंबियांबरोबरच मित्रपरिवार व स्थानिकांवर शोककळा पसरली आहे. माणगाव भादाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्य संस्कार करण्यात आले. त्यावेळी अंत्य विधीला मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांन बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - कुशिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.-पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| कांचन दिलीप अवचारे | ४५ | २ ब | ०-२१-२० | ३ | ०० |
| कांचन दिलीप अवचारे | ४६ | २अ | ०-२२-५० | ३ | ३२ |
| कोकीळा दिलीप अवचारे | ४५ | २क | ०-०६-६० | ० | ८७ |
| कोकीळा दिलीप अवचारे | ४५ | २अ | ०-५०-७० पैकी ०-२०-०० | ७ | १९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
सही /-
**ॲड.जयेश संभाजी म्हसे**
कार्यालयीन पत्ताः- ए विंग, फ्लॅट नं.४,चौथा मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१
दिनांक :-१२/०१/२०२५
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेलः- adv.jayeshmhase@gmail.com

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे सायडोंगर, ता. कर्जत, जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक फुरकान मोहम्मद हस्सन फारूकी यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ३३ | २ | ०-५१-६० पैकी ०-३१-६० इतके लिहून देणार यांचे मालकीचे विकत दिलेले क्षेत्र | ०-९० |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.
कर्जत
ता.११/०१/२०२५
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ० २, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे खांडपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे खांडपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| रघुनाथ दामा फाटे शांताराम दामा फाटे | ३१ | ६ | ०-४५-६० | २.६२ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे, असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.
कर्जत
दिनांक : १२/०१/२०२५

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ता: कोर्ट व्यु को. ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं. १, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ९५९५३२४२३४/९५६१५७५६२६

**ॲड. राजेंद्र पी. निगुडकर**
पत्ता: ओम श्री भाग्योदय को. ऑप. हौ.सो.
कोतवाल नगर, कर्जत, जि. रायगड
मो.: ९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस हया नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे-आंबेपुर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मनोज प्रकाश धुमाळ यांचकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहेत.

संदर्भित बिनशेती जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून दयावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रं. | एकुण क्षेत्र - (आर.चौ.मी) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| आंबेपुर, ता. अलिबाग, जि. रायगड. | २३/१/३/२ | २०-२०-०० | २०२.०० |

वरील नमूद मिळकतींपकी श्री. मनोज प्रकाश धुमाळ यांच्या नावे असलेली बिनशेती मिळकतीचे, क्षेत्र -४-५०-०० आर.चौ.मी. आकार-४५.०० रु. पै., ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

अलिबाग,
दि. ११/०१/२०२४

**महेश सुहास म्हात्रे**
अधिवक्ता
नावनोंदणी क्रमांक एमएएच/५७७३/२००६
ऋतुराज प्लाझा, तळमजला, फ्लॅट क्रमांक १.
शिवाजी चौक, गावडे ऑप्टिक्स जवळ,
अलिबाग रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे कोळगांव, ता. अलिबाग जि. रायगड येथील गट नं. १२५, एकुण क्षेत्र ०-८५-६० हे.आर., आकार १६.०६ रू. पैसे, सदरहु मिळकतीपैकी सारीका शरद भगत व शैला बाळकृष्ण गावंड यांच्या मालकीचे क्षेत्र ०-३३-०० हे. आर., आकार ६.०६ रू. पैसे व मंगेश पोसु म्हात्रे व अनिल पोसु म्हात्रे यांच्या मालकीचे क्षेत्र ०-५२-६० हे.आर., आकार १०.०० रू. पैसे ही मिळकत (तद्नंतर सदर जाहीर नोटीसीत ''सदर मिळकत'' असा उल्लेख केलेला आहे.) या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन आमच्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १०/०१/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता -श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे ''मालमत्ता'' असे उल्लेखित ) संदर्भामध्ये परशुराम शंकर पाटील (''मालक'') यांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं, वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड, यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - शहाबाज, तालुका- अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग २०१, एकूण क्षेत्र ००.६१.७० (हे.आर.चौ.मी.) आकार ७ रु.६२ पै. धारक जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग आणि खालील प्रमाणे सीमाबद्धः
ठिकाण : अलिबाग
दिनांक : /०१/२०२५

**झुंजारराव आणि कं. करीता**
सही/-
**विक्रांत झुंजारराव**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

१२ जानेवारी
१) श्रीम. वसुधा वसंत साळवी
अलिबाग, १२-१-१९५१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**


कै. नरसय्या य. साईनी, ४ थे पुण्यस्मरण, अलिबाग


कै. सौ. लता जयवंत म्हात्रे, द्वितीय स्मृतिदिन, नागाव (वारीक आळी) उरण


कै. प्रभाकर दाजी पाटील, स्मरणार्थ, मापगाव, अलिबाग


कै. राजेश बाळकृष्ण म्हात्रे, मित्र परिवार, अलिबाग

स्व. दिलीप लक्ष्मण लागू, स्मरणार्थ

# लग्न जमविताना पालकांची दमछाक

**| माणगाव | वार्ताहर |**

तुलसी विवाहानंतर ग्रामीण भागात लग्नसराई खऱ्या अर्थाने सुरू होते. अनेक वधू-वर पित्यांचे पालक, नातेवाईक विवाह इच्छुक वधू-वरांसाठी सुयोग्य जोडीदार शोधायला सुरुवात करतात.



कोकणातील काही तालुक्यात मात्र या विवाह इच्छुक वरांच्या पालक नातेवाईकांना वेगळाच अनुभव येत आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या विवाह इच्छुक मुलींची अपेक्षा वाढली असून त्यांना गावात राहणारा वर नको असल्याचे दिसून येत आहे. कर्तव्य असलेल्या वधू पिता, नातेवाईक वर मुंबईत राहतो का, स्वतःची खोली आहे का? पगार चांगला आहे का? गाडी आहे का? हे प्रश्न पहिले विचारताना दिसत आहेत. या प्रश्नांची उत्तरे हो आली तरच पुढील बोलणी होत आहेत. नाहीतर पुढील बोलनीचा विषय तेथेच थांबविण्यात येत आहे.

दुर्गम तालुक्यातील काही तरुण आजही गावाकडे राहून शेती, भाजीपाला उत्पादन व तत्सम रोजगार करतात. मात्र बदलत्या काळानुसार शिकलेल्या मुली जीवनसाथी निवडताना शहरातील राहणारा व शहरात स्वतःचे घर असलेल्या जोडीदारासाठी आग्रही असल्याचे दिसून येत आहे. यामुळे ग्रामीण भागात राहणाऱ्या विवाह इच्छुक तरुणांचे लग्न जमविताना पालकांची पूर्ण दम छाक होत आहे. अनेक गावांत लग्न जमावयास हवे म्हणून कर्तव्य असलेल्या तरुणांना काही दिवस शहरात खोली घेऊन राहायला पाठवित आहेत. जेणेकरून कोठेतरी लग्न जमवून येईल. वधू बरोबरच पालकही मुलीचे लग्न जमविताना शहरातील राहणारा व स्वतःची खोली , घर असणाऱ्या जावयास पसंती देताना दिसत आहेत. गावी राहतो, चांगली आर्थिक स्थिती असली तरी अशा विवाह इच्छुक तरुणांची लग्ने जुळण्यास अनंत अडचणींना पालकांना सामोरे जावे लागत आहे. शिक्षणाचा झालेला प्रसार व शहरांचे आकर्षण यामुळे अशा प्रकारची समस्या पुढे येत असल्याचे जाणकार सांगत आहेत. शिक्षण अपूर्ण, शहरात राहण्याच्या सुविधेचा अभाव यामुळे गावी असलेल्या विवाह इच्छुक तरुणांना अनेक ठिकाणी विवाहासाठी प्रस्ताव ठेवूनही नकार मिळण्याचे प्रमाण वाढले आहे.

> गेल्या काही दिवसांपासून ही समस्या समाजात दिसून येत आहे. वधू कडील मंडळी व स्वतः वधू अशा प्रकारे मागणी करीत आहेत. त्यामुळे गावी राहणारे व व्यवस्थित सक्षम असलेल्या वरांनाही वधू मिळताना अडचणी जाणवत आहेत.
> – दत्ताराम यादव, पालक

> मुलींनी अशा प्रकारची अपेक्षा ठेवण्यात गैर काही नाही. गावात असणाऱ्या सेवा सुविधांचा अभाव यामुळे मुली शहरांकडे राहणे पसंत करीत आहेत. त्याचप्रमाणे शहरात स्वतःची खोली, प्लॅट असेल तर अशाच स्थळांना मुली होकार देताना दिसत आहेत. भविष्याचा विचार करून मुली असा निर्णय घेत असाव्यात.
> – श्वेता मोंडे, तरुणी

> ग्रामीण भागात गेल्या काही वर्षांत ही समस्या जास्त प्रमाणात दिसते. मुलींचे शिक्षणाचे वाढलेले प्रमाण व कमी झालेली संख्या यामुळे विवाहाच्या समस्या दिसत आहेत. पूर्वी मुलींच्या पालकांकडून विचारणा होत असे. आता मात्र वर पित्यांना वधू संशोधन करण्यास खूप अडचणी येत आहेत. शहरात राहणारा वर त्याचे शहरात स्वतःचे घर आहे का, या बाबी महत्वाच्या झाल्या आहेत.
> –रामदास जाधव, पालक



# वाघेरी विद्यालयात विज्ञान प्रदर्शन उत्साहात

**माणगाव :** छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित जय जवान जय किसान माध्यमिक विद्यालय वाघेरी येथे शाळांतर्गत आविष्कार-कल्पकतेकडून कृतीकडे २०२४-२५ विज्ञान प्रदर्शन मंगळवारी ७ जानेवारी रोजी अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन वारंगी ग्राम पंचायतीचे सरपंच दत्ताराम ढेबे, शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश देवरुखकर यांच्या हस्ते करण्यात आले.

विज्ञान प्रदर्शनात सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, जलविद्युत, पाणी शुद्धीकरण, औषधी वनस्पती, वैद्यकीय शास्त्र इत्यादी विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रतिकृती सादर केल्या. सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रकाश देवरुखकर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच संस्था पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आहे.

दरम्यान, या विज्ञान प्रतिकृतीतून प्रथम क्रमांकाची प्रतिकृती विभाग स्तरावर शाळेचे प्रतिनिधित्व करणार आहे.

# नवीन शैक्षणिक धोरणबाबत कार्यशाळा




**| माणगाव | प्रतिनिधी |**

येथील जे. बी सावंत एजुकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलज आणि सविता नीलकंठ सावंत जुनिअर कॉमर्स कॉलजमध्ये नवीन शैक्षणिक धोरण २०२० विषयी सविस्तर कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी जवळपास १२० विध्यार्थी व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे येथील सहाय्यक प्रा. साहिल कुरेशी व प्रा. राजेश्वर धनपलवार यांनी नवीन शैक्षणिक धोरण २०२० विषयी इयत्ता ११ वी,१२ वी व पदवीच्या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या धोरण विषयी असलेले समज, गैरसमज याविषयी चर्चा केली. १९८६ नंतर २०२० मध्ये हे शैक्षणिक धोरण बदलण्यात आले असून त्याचा फायदा विद्यार्थ्यांना कसा होणार आहे. या विषयी मार्गदर्शन केले. यावर्षी महाराष्ट्र शासन सर्व विद्यापीठात व त्यांच्याशी संलग्न महाविद्यालयात या नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी केली आहे. त्यानुसार नवीन विषय नवीन अभ्यासक्रम सुरु झाले आहेत. आता यापुढे ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम व १ वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम असणार आहे. इयत्ता ११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना या शैक्षणिक धोरणाची माहिती व्हावी यासाठी हा उपक्रम केला होता.

# जुन्या जाणत्या खेळाडूंचे प्रयास आवश्यक – विजय सावंत

**| अलिबाग | वार्ताहर |**

आजच्या काळात क्रीडाक्षेत्राला पूर्वीपेक्षा चांगले दिवस आल्याचे जाणवत असले तरी आपल्या क्षेत्रातील एकमेकांबद्दल असलेली आत्मीयता क्रीडा संघटनांमधील आपुलकी उतरणीस लागली आहे की काय, असा प्रश्न पडू लागला आहे. पूर्वीच्या काळात खेळातील एकमेकांच्या उत्कर्षणाचा देखील विचार होत असे. खिलाडूवृत्तीने खेळ अधिक चांगला करण्यासोबत खेळाची गुणवत्ता उंचावर नेण्यासाठी जुन्या जाणत्या खेळाडूंचे प्रयास आवश्यक आहेत, असे प्रतिपादन विजय सावंत यांनी केले.



समितीच्यावतीने ग्राहक पेठेचे सूर्यकांत पाठक यांच्या हस्ते ॲड. विजय सावंत यांचा अमृतमहोत्सवी सत्कार फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथे अलका काकतकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्रकाश रेणूसे होते. यावेळी ॲड. सुषमा विजय सावंत यांचाही खास सत्कार सोनिया नेवरेकर यांच्या हस्ते करण्यात आला.


यावेळी मनोज पिंगळे, आकांक्षा हगवणे, शकुंतला खटावकर, डॉ. मधुसूदन झंवर, दिलीप कुंभोजकर, श्रीकांत पाटील, बाळासाहेब साने, डॉ. मंजू जुगदर, अरविंद ठोगे पाटील, भोला वांजळे, श्रीकांत जगताप, ए.सी.पी. सुषमा सावंत, डॉ. सतीश देसाई आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.

ॲड. प्रेम अगरवाल, पवन नेवरेकर, मोहन गोस्वामी, ॲड. विजय आढाव, ॲड. केशव गोडे आदींनी कार्यक्रमाच्या यस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले. तर, श्रीनाथ हगवणे यांनी स्वागत केले. सुनील नेवरेकर यांनी प्रास्ताविक केले. नरेश पेडणेकर यांनी आभार व्यक्त केले. संजय गोखले यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. दरम्यान, आजच्या घडीला फक्त स्वतःपुरते बघण्याची वृत्ती वाढत असल्याचे अनुभवयास मिळते. हा धोका प्रत्यक्षात खेळासाठी मारक ठरू शकतो असे सांगितले.

# साप्ताहिक राशिभविष्य १२ जानेवारी ते १८ जानेवारी २०२५


ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

## व्यावसायिकांना फायदा होण्याची शक्यता




**मेष :-** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात विकासाचे घर सक्रिय राहिल्यामुळे आपल्याला व्यावसायिक क्षेत्राची वाढ होण्यास मदत करण्यासाठी अनेक संधी मिळतील. आपली मेहनत आपल्याला व्यावसायिक क्षेत्रातील अडथळे सहजपणे पार करण्यास मदत करेल. या राशीच्या व्यावसायिकांना मोठा फायदा होण्याची शक्यता आहे. बऱ्याच काळापासून रखडलेले एखादे काम सुरू करण्यासाठी ही चांगली वेळ असल्याचे देखील सिद्ध होऊ शकते. तथापि, काही ग्रहस्थितीमुळे, वाईट सवयी सोडा, किंवा त्यांच्या आहारी न जाण्याचे धोरण ठेवा. निरोगी जीवनाकडे महत्व लक्षात घ्या. आठवड्याच्या शेवटी, ग्रहस्थिती हे सूचित करते की आपल्या भूतकाळातील चुका आणि अनुभवांकडून आत्म-आकलन करण्याची आणि समजून घेण्याची आणि शिकण्याची वेळ आली आहे. **महिलांना-** या काळात आपली वृत्ती थोडीशी हट्टी आणि मतलबी होऊ शकते, ज्यामुळे वैयक्तिक आणि व्यावसायिक दोन्ही बाबींवर समस्या उद्भवू शकतात. म्हणूनच, तुम्ही तुमच्या स्वभावाने सौम्य बनण्याचा प्रयत्न करा आणि कोणताही निर्णय घेण्यापूर्वी इतरांनी दिलेल्या सल्ल्याचे पालन करा. **शुभ दिनांक** -१३,१४

## गुंतवणूक करण्याचा निर्णय



**वृषभ :-** एकूण ग्रहमान पाहता या आठवड्याच्या सुरूवातीस, ग्रहस्थिती हे सूचित करते की या कालावधीत आपल्या जीवनसाथीची संपत्ती वाढू शकते. या व्यतिरिक्त हे घर संयुक्त वित्त संबंधित देखील आहे, यावेळी आपण दोघेही प्रॉपर्टी किंवा पॉलिसीमध्ये एकत्र गुंतवणूक करण्याचा निर्णय घेऊ शकता किंवा एकाच वेळी बँकेत संयुक्त खातेदेखील उघडू शकता. असे केल्याने आपल्यातील दोघांचे संबंध आणि नाते दृढ होण्यास मदत होईल. मध्येच या राशीच्या लोकांच्या घरात एक शुभ कार्यक्रम होऊ शकतो, कारण चंद्र प्रॉपर्टी, स्टॉक मार्केट आणि ट्रेडिंगमध्ये गुंतवणूकीसाठी देखील हा एक चांगला काळ आहे कारण भविष्यात आपल्याला त्याचा मोठ्या प्रमाणात फायदा होण्याची शक्यता आहे. हा एक चांगला काळ आहे जो भविष्यात आपल्यासाठी उपयुक्त ठरू शकतो आणि जीवनात अचूकतेने पुढे जाण्यास मदत करू शकतो. **महिलांना-** या कालावधीत काही या राशीच्या लोकांना त्यांच्या सासरच्या पक्षाकडून किंवा आपल्या जोडीदाराच्या पालकांकडून लाभ मिळू शकतात. साखर, तांदूळ, दुधासारख्या सफेद गोष्टी सोमवारी आणि शुक्रवारी दान करा. **शुभ दिनांक** -१५,१६

## समस्यांना सामोरे जावे लागेल




**मिथुन :-** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आपल्या विचारांना आपल्या कामाच्या ठिकाणी वरिष्ठांचे समर्थन आणि भरपूर प्रशंसा मिळेल. व्यावसायिकदृष्ट्या, या राशीच्या जातकांना व्यावसायिक क्षेत्रात काही नवीन यश मिळण्याची शक्यता आहे, जे आपल्यासाठी बरेच नवीन मार्ग उघडत असल्याचे सिद्ध होऊ शकते. या व्यतिरिक्त, या राशीच्या अविवाहित लोकांसाठी ही वेळ चांगली ठरू शकते कारण या काळात ते त्यांच्या लव इंटरेस्ट किंवा जीवनसाथीला भेटू शकतात. तथापि, मात्र या कालावधीत आपली प्रतिकारशक्ती कमी होऊ शकते, ज्यामुळे आपल्याला आरोग्याशी संबंधित काही समस्यांना सामोरे जावे लागेल. परिणामी त्यांच्या विलास आणि सुख-सुविधांमध्ये वाढ होईल कारण आराम आणि विलासिताचे प्रतिनिधित्व करणारी स्थाने कार्यन्वित होणार आहेत. या व्यतिरिक्त, मालमत्ता संबंधी काही नवीन घडामोडी जसे की विक्री, खरेदी, नूतनीकरणाची शक्यताही आहे. **महिलांना-** तुळशीच्या झाडाची प्रतिदिन पूजा करा. आठवड्याच्या सुरूवातीस या राशीच्या लोकांसाठी ग्रहस्थितीमुळे,काही चांगले परिणाम मिळणार आहेत. या कालावधीत आपल्या आईबरोबरचे आपले संबंध सुधारण्याची शक्यता आहे, **शुभ दिनांक** -१७,१८

## आर्थिक फायदे होतील




**कर्क :-** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात काहीसी स्थिती छोट्या यात्रेसाठी फायदेशीर ठरेल आणि हे त्यांच्यासाठीही चांगले ठरेल जे आयात-निर्यातीत व्यस्त राहू इच्छितात किंवा परदेशी भूमीपासून नवीन सुरुवात करू इच्छितात. आठवड्याच्या मध्यला काही अडचणी येतील कारण ही ग्रहस्थिती काहीशी दुर्बल मानली जाते, परिवर्तन आणि रोगाचे घर देखील मानले जाते. या कालावधीत, आपल्या योजना आणि कल्पना साकार होण्यासाठी नेहमीपेक्षा जास्त वेळ घेऊ शकतात, यामुळे आपणास आत्मविश्वास आणि सर्जनशीलता कमी वाटू शकते. व्यावसायिक ताणामुळे आपल्या वैयक्तिक जीवनावरही परिणाम होऊ शकतो कारण आपण या वेळी अत्यंत आक्रमक आणि सहज रागावू शकता, परिणामी आपल्या साथीदाराबरोबर आणि मुलांशी संघर्ष होऊ शकतात. **महिलांना-** आठवड्याच्या शेवटच्या टप्प्यात, ग्रहस्थिती. हे सूचित करते की हा कालावधी मागील वेळेपेक्षा चांगला असेल आणि या कालावधीत आपल्याला आर्थिक फायदे देखील मिळतील. या काळात आपल्या वडिलांचीही परिस्थिती समृद्ध होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे कुटुंबात आनंदी वातावरण निर्माण होईल. **शुभ दिनांक** -१२,१४

## प्रशंसा आणि सहयोग मिळेल



**सिंह :-** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात वकील, सीए, शिक्षक, लिपिक इत्यादी व्यावसायिकांना या संक्रमण काळात चांगले परिणाम मिळण्याची शक्यता आहे. शासकीय किंवा स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रयत्नात शुभ परिणाम मिळण्याची शक्यता आहे. दररोज सकाळी भगवान शिवच्या ''श्री शिवलीलामृत''चे वाचन करा किंवा ऐका. सप्ताहाच्या सुरुवातीमध्ये आपल्या ग्रहस्थिती या गोष्टीकडे इशारा करते की, या सप्ताहात तुम्ही आपल्या आरोग्याला घेऊन अधिक सतर्क राहाल आणि आपल्या जीवनाला उत्तम बनवण्यासाठी सर्व गरजेची कामे कराल. या सप्ताहात तुम्ही योग, ध्यान किंवा काही नवीन व्यायामाच्या माध्यमाने स्वतःच्या आरोग्यावर काम करतांना दिसाल. हे न फक्त तुमची शारीरिक गोष्टीत मदत करेल तर तुम्हाला व्यावसायिक लाभ ही प्रदान करणारे सिद्ध होईल. **महिलांना –** तुमची सकारात्मकता तुमची उत्पादकता आणि दक्षतेला वाढवण्यास मदत करेल. या वेळात तुमच्या जीवनसाथी सोबत संवाद, समन्वय करण्यासाठी तुमच्या अतिरिक्त प्रयत्नांना यश मिळेल. **शुभदिनांक** -१३,१७

## आरोग्यविषयक समस्या



**कन्या :-** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्ही या वेळात आपल्या दृष्टिकोनात अधिक सहज आणि कार्य उन्मुख व्हाल जे तुमच्या अडकलेल्या कार्याला सहजरित्या पूर्ण करण्यात तुमची मदत करेल. सप्ताहाचा मध्य प्रेमी जोडींसाठी एक चांगली वेळ सिद्ध होईल कारण, या काळात तुमच्या साथी किंवा प्रेमीसोबत तुमची समज आणि सद्भाव वाढवण्यात मदतगार सिद्ध होईल. या काळात विवाहित लोकांना कुटुंबातील विस्ताराच्या रूपात काही चांगली वार्ता ही मिळू शकते. याच्या व्यतिरित उच्च शिक्षणासाठी परदेशातील विश्व विद्यालयात प्रवेश घेणारे काही इच्छुक विद्यार्थाना या काळात काही सकारात्मक वार्ता मिळण्याचे संकेत आहे. सप्ताहाच्या शेवटी कमजोर स्थितीमध्ये तुमचे घर, कार्यालय किंवा वाहनात नूतनीकरण रूपात अचानक खर्च होऊ शकतात. ज्याच्या परिणामस्वरूप, तुमच्या जीवनात अवांछित तणाव आणि खर्च वाढण्याची शक्यता आहे. **महिलांना-** या राशीच्या जातकांना आपल्या आईच्या आरोग्य विषयक समस्या पाहायला मिळतील. यामुळे त्यांची काळजी घेणे खूप गरजेचे आहे. कुटुंबातील सदस्यांमध्ये मतभेद होऊ शकतात. **शुभ दिनांक** -१७,१८

## धनसंयोग संभवतो




**तुळ :-** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आताची ग्रहस्थिती तुमच्या कुंडलीमध्ये खूप मजबूत धन संयोग बनवत आहे. हे याकडे इशारा करते की, या काळात तुम्हाला आपल्या संचित धन आणि बचतीच्या व्यतिरिक्त विभिन्न स्रोतांनी कमाई करण्याची नवीन संधी मिळेल. व्यावसायिक रूपात हे तुमचे विचार आणि सूचनांच्या आदान-प्रदानासाठी चांगली वेळ सिद्ध होईल कारण, यावेळी तुमच्या समोर बऱ्याच उत्तम संधी येतील. तुम्ही विवाहित असाल तर, या काळात तुम्ही आपल्या मुलांसोबत आनंदाचे क्षण घालवाल यामुळे तुमच्या घरातील वातावरणात आनंद येण्याची शक्यता असेल. **महिलांना-** प्रेमात असलेले या राशीतील जातक या वेळात आपल्या पार्टनरला घेऊन थोडे असुरक्षित असतील यामुळे त्यांच्या नात्यामध्ये थोडी कटुता येण्याची शक्यता आहे. भांडणाचे क्षण कुटुंबातील वातावरण खराब करतील तथापि, या मतभेदांना समजणे आणि त्यावर मार्ग काढण्यासाठी ही वेळ उत्तम सिद्ध होऊ शकते. सकाळच्या वेळी नियमित गायत्री मंत्राचा जप करा. त्यामुळे नियमित वातवरणात बदल होईल तो बदल तुम्हाला शुभ होऊ शकेल. **शुभ दिनांक-** १२,१५

## सकारात्मक बदल घडेल




**वृश्चिक :-** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात प्रत्येक तथ्याला सावधानीने पाहिल्या नंतर आणि दुसऱ्यांच्या माध्यमाने प्राप्त होणाऱ्या माहितीला चांगल्या प्रकारे पडताळणी करूनच मग निर्णय घ्या कारण, या वेळी प्रबळ शक्यता आहे की, तुम्हाला मिळणारी सर्व माहिती योग्य नसेल आणि असा घाईगर्दीत घेतलेला निर्णय तुमच्यासाठी नुकसानदायक सिद्ध होऊ शकतो. सोबतच, या काळात तुमचे उद्दिष्ट्य आणि महत्वाकांक्षाला प्राप्त करण्यासाठी तुम्हाला सामान्य पेक्षा अधिक प्रयत्न करावे लागू शकतात. लाभदायक परिणाम प्राप्त करण्यासाठी या सप्ताहाच्या वेळी चांदीच्या ग्लासमध्ये पाणी प्या. त्यामुळे आपल्याला सकारत्मक बदल झालेला दिसेल. **महिलांना-** या वेळी ऑफिसला जाण्याऐवजी आपण वर्क-फ्रॉम-होम विकल्प निवडू शकतात. त्यामधून घरातील सुरक्षेच्या संबंधित हेतू पूर्ण होऊ शकतो. तरीही हा कालावधी तुमच्या वित्तसाठी व्यवस्था करणे किंवा त्याला योग्य प्रकारे प्रबंधन करण्यासाठी एक खूप चांगला काळ सिद्ध होत आहे. तुम्ही फक्त आपले विजेचे व इतरबील जास्त येणार नाही याची काळजी घ्या. **शुभदिनांक –** १४, १६

## धनप्राप्ती होईल




**धनु :-** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहाच्या सुरुवातीमध्ये ग्रहस्थितीचा परिणाम स्वरूप व्यावसायिक लोक या काळात मनाची शांतता घेण्यास अधिक इच्छुक असतांना दिसतील. तसेच सही करण्यापूर्वी त्यांनी कागदपत्र योग्य प्रकारे पहावीत. या ग्रहस्थितीमुळे तुम्हाला संतृष्ट वाटेल आणि हे सुरक्षेच्या भावनांना वाढवण्यात मदत करेल अशी आहे. सप्ताहाचा मध्य तुमच्यासाठी सर्वात चांगला असेल. या काळात जर तुम्ही नवीन परियोजना सुरु करण्याच्या विचारात आहे तर, त्यासाठी ही वेळ खूप शुभ सिद्ध होऊ शकते कारण, या काळात तुम्ही ऊर्जा आणि उत्साहाने परिपूर्ण असाल. आपला व्यवसाय नेटवर्किंगने जोडण्यासाठी हा कालावधी उत्तम ठरू शकतो. जिथे तुम्ही अतिरिक्त धन प्राप्त करू शकतात. सप्ताहाच्या शेवटी शिक्षक, पब्लिक डीलिंग, खेळ इत्यादींच्या संबंधित व्यवसायाने जोडलेल्या लोकांसाठी चांगली वेळ सिद्ध होऊ शकते. **महिलांना-** हा काळ याकडे ही इशारा करते की, आपल्या आकर्षणाच्या बळावर तुम्ही इतर लोकांना आपल्याकडे आकर्षित कराल. यामुळे तुम्ही काही नवीन भागीदारी करू शकाल. आपली कामे योग्य रीतीने पूर्ण करू शकाल. **शुभदिनांक** -१५,१७

## चांगल्या संधी मिळण्याची शक्यता



**मकर :-** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आपल्या क्षमतेनुसार या वेळी यशस्वी होण्यासाठी बऱ्याच संधी प्राप्त करू शकतात. व्यावसायिकांना सल्ला दिला जातो की, त्यांनी सोशल नेटवर्किंग साधनांचा उपयोग केला पाहिजे ज्यामध्ये त्यांना आपल्या कार्यक्षेत्राच्या विस्तारासाठी चांगल्या संधी मिळण्याची शक्यता आहे. विद्यार्थी या वेळी आपल्या क्षमतांचे उत्तम प्रदर्शन ही करतील. या वेळी नवग्रह स्तोत्र वाचन फायद्याचे राहील. या काळात तुम्हाला मेल, इंटरनेट इत्यादी माध्यमाने काही महत्वाचे कागदपत्र प्राप्त होऊ शकतात ज्याची तुम्ही बऱ्याच काळापासून वाट पाहत होते. तुमच्या कार्य स्थळी अचानक तुम्हाला काही महत्वपूर्ण भूमिका आणि जबाबदाऱ्यांना सांभाळण्यासाठी सांगितले जाऊ शकते ज्यामध्ये तुम्ही आनंदी ही असाल आणि थोडे तणावात ही राहू शकतात. तसेच हा कालावधी लहान यात्रांना ही दर्शवतो म्हणून, मौज मस्ती किंवा व्यापाराच्या संबंधित गोष्टींसाठी ही या काळात तुमच्या काही यात्रा होऊ शकतात. **महिलांना-** सप्ताहाच्या सुरवातीमध्ये ग्रहस्थिती या गोष्टीकडे इशारा करते की, तुम्ही या काळात आपल्या भाऊ बहीण, मित्र आणि नातेवाईका सोबत चांगल्या योगाचा आनंद घ्याल. धनप्राप्ती होण्याचा ही हा कालावधी आहे. **शुभ दिनांक** -१६,१८

## कामावर लक्ष केंद्रित करा



**कुंभ :-** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात परदेशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही वेळ चांगली सिद्ध होऊ शकते कारण, त्यांना या संबंधित काही शुभ वार्ता मिळण्याची शक्यता आहे. सप्ताहाच्या मध्यात काळात तुम्ही थोडे घाबरलेले आणि चिंतीत दिसू शकता कारण, तुम्ही स्वतःच्या बाबतीत विचार करण्याऐवजी कुठल्यातरी वेगळ्या गोष्टीच्या विचारात राहू शकता. लोक तुमच्या बाबतीत काय विचार ठेवतात आणि याचा सरळ प्रभाव तुमच्या आत्मविश्वासावर पडेल. ज्यामुळे तुम्ही कार्यस्थळी आपले उत्तम प्रदर्शन करू शकणार नाहीत. म्हणून, आपल्या क्षमतांवर विश्वास ठेवा आणि आपल्या कामावर लक्ष केंद्रित करा आणि या गोष्टीकडे अजिबात लक्ष देऊ नका की, इतर लोक तुमच्या बाबतीत काय विचार करत आहे. तुमचा आत्मविश्वास वाढेल आणि तुमचे प्रदर्शन ही उत्तम होईल. **महिलांना-** घरातील वातवरण आनंदी राहील. मनात योजलेले काही कार्य या वेळी जमून येईल. जीवनसाथी आपणास सरप्राईज देऊ शकतो. मुलांना दमदाटी करू नका. त्यांची समस्या प्रेमाने सोडवण्यासाठी त्यांना मदत करा. **शुभदिनांक** -१७,१८

## आर्थिक बाजू ठीक राहील



**मीन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात हा कलावधी हे दर्शविते की आपण आपल्या व्यवसायातील कार्यक्षेत्रात पुढे जायचे असल्यास, आपल्या कौशल्यांचा लाभ घेण्यासाठी आणि नवीन काहीतरी शिकण्यासाठी हा उत्कृष्ट काळ आहे. आठवड्याची सुरूवात या राशीच्या जातकांसाठी खूप चांगली राहणार आहे, काही गोष्टी आपणास सहज मिळतील आणि जे सहज मिळणार नाही ते आपण परिश्रमाने मिळवू शकाल. या वेळी आपण आपल्या कोणत्याही गुरु किंवा सल्लागारांना भेटू शकता. ज्यांच्याशी आपण कल्पनांची देवाणघेवाण करू शकता, त्यांच्याशी सल्लामसलत करू शकता आणि आपल्या जीवनात एक चांगले बदल आणू शकता. एकूणच आपल्या आठवड्यासाठी ही खूप चांगली सुरुवात होणार आहे. आपल्याला पैसा, करियर आणि पद-प्रतिष्ठाच्या यासर्व गोष्टी अचानक मिळू शकतील. **महिलांना-** दररोज सकाळी गणपतीची पूजा करा. हाती घेतलेल्या कामांचा निपटारा करा. आर्थिक बाजू ठिक राहील. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. प्रकृतीची पथ्ये पाळा. विशेषतः पाणी उकळून घ्या. रात्रीचा आहार मोजकाच घ्या. **शुभदिनांक** -१२,१७

# मलेशिया ट्रुली एशिया

भारतीयांसाठी बजेटनुसार देशांतर्गत आणि परदेशात जाण्यासाठी वेगवेगळे विभाग आहेत. भारतातील प्रमुख पर्यटनस्थळांना भेटी दिल्यानंतर परदेश पर्यटनाचे वेध लागायला लागतात. अशा वेळी सर्वप्रथम शेजारील देशांवर नजर पडते. भारतालाच चिकटून असलेल्या नेपाळ, भूतान, तिबेट, बांगलादेश किंवा दक्षिणेकडील बेट श्रीलंका या देशांवर नजर जाते. भारतीय चलनाची या देशांमधील तगडी किंमत, आपण ठरविलेल्या खर्चापेक्षा कमी खर्चात हे देश फिरवून आणते. त्यापुढे नजरेच्या किंवा बजेटच्या टप्प्यात असणारे देश म्हणजे आखाती देशातील सात अमिराती ज्यामध्ये प्रामुख्याने दुबई, शारजा, अबूधाबी यांचा समावेश होतो. तेथे सहज मिळणारे भारतीय खाद्यपदार्थ आणि बोलण्यासाठीची सहज सोपी हिंदी भाषा, यामुळे भारतीय पर्यटक तेथे अधिक आकर्षित होतात.

त्यानंतरचा मोठा टप्पा म्हणजे, भारताच्या पूर्वेकडील म्यानमार, थायलंड, मलेशिया, इंडोनेशिया, लाओस, कम्बोडीया, व्हिएतनाम, फिलिपिन्स, ब्रुनेई, सिंगापूर, हाँगकाँग आदी देशांचा समूह. चीनी व मंगोलियन संस्कृतीचा, चालीरितींचा आणि खाण्यापिण्याच्या सवयींचा प्रभाव असलेल्या या देशांमध्येही भारतीयांनी पर्यटनाला जाणे कायम पसंत केले. काही ट्रॅव्हल कंपन्यांनी आपल्यासोबत भारतीय आचारी नेऊन पर्यटकांना कायम बांधून ठेवले तर त्या त्या देशांनी भारतीय खाद्यपदार्थ देणाऱ्या देशांना आपल्या येथे भारतीय आहार देणारी रेस्टॉरंट, खान-पान सेवा देण्यास प्रवृत्त केले. त्यासाठी सवलतीही दिल्या. याआधी या देशांमध्ये जाण्याचे आणखी एक आकर्षण म्हणजे. तेथे मिळालेल्या 'ड्युटी फ्री' इलेक्ट्रॉनिक्स गोष्टी.

या देशांच्या समूहातील भारतीय पर्यटकांना सर्वाधिक आकर्षित करणारा देश म्हणजे मलेशिया! या देशाची ड्रॅगलाईनच 'ट्रुली एशिया' अशी आहे. पर्यटकांना प्रचंड सवलती देणे, सोयीसुविधा सहज उपलब्ध करून देणे, एवढेच कमी परंतु अलिकडेच म्हणजे, गेल्या महिन्यापासून, डिसेंबर २०२४ पासून मलेशियाने भारतीय पर्यटकांसाठी मोफत व्हिसा देण्याची व्यवस्था केली आहे. आगामी दोन वर्षांसाठी भारतीयांना हा 'व्हिसा' मोफत दिला जाणार असून ऑनलाईन व्हिसाची देखील सोय करण्यात आली आहे.लख्ख सूर्यप्रकाश, सुंदर सागरी किनारा आणि घनदाट जंगल या त्रिसूत्रींनी समृद्ध असलेला हा देश. मलय वंशांचे निम्मे आणि उरलेल्या सुमारे साडेतीन कोटी लोकसंख्येच्या या देशाच्या समृद्धीला हातभार लावलाय तो भारतीय आणि चीनी वंशांच्या लोकांनी. एकूण नऊ राजघराण्याच्या वंशांतील लोकांनी नऊ परगण्यांवर राज्य केले आणि आळीपाळीने ते देशावर राज्य करताहेत.

२००४ पर्यंत १४८३ फूट उंचीचा ८८ मजल्यांच्या 'पेट्रोनास' हा ट्वीन टॉवर जगातील सर्वोच्च उंचीची इमारत म्हणून ओळखला जात होता. मात्र या देशाची प्रमुख ओळख गुनूंग मुलू नॅशनल पार्क, किनाबालू पार्क, मेलाका ही प्राचीन परंपरा जपणारी नगरी, जॉर्ज टाऊन व लेंगाँग व्हॅली या युनेस्कोने नोंद केलेल्या गोष्टी आहेत. सारनाक गुंफा,






मलेशियन सरकारने भारतीय पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी, २०२६ च्या ३१ डिसेंबर पर्यंत व्हिसा माफ करण्याची योजना जाहीर केली आहे. या योजनेनुसार पर्यटन सामाजिक, उद्योग किंवा ट्रांझिट पॅसेंजर आदी अन्य कारणास्तव मलेशियात दाखल होणाऱ्या भारतीय पर्यटकांना ३० दिवसांसाठी विनामूल्य व्हिसा देण्यात येणार आहे. आगामी दोन वर्षांसाठी ही योजना जाहीर करण्यात आली आहे भारतीय पर्यटकांना फक्त ''मलेशिया डिजिटल अरायव्हल कार्ड'' म्हणजे (MDAC) प्रवासाला निघण्याआधी भरावयाचे आहे.










**ट्रॅव्हल व्हिजन**
**विनायक दळवी**

तसेच बोर्निओ बेट ही या देशाची खरी श्रीमंती आहे. आशिया आणि ओशोनिया खंडांशी एकत्रित सीमारेषांनी जोडलेल्या या देशाची आणखी एक आगळीवेगळी ओळख आहे. ६५ हजाराहून अधिक लांबीचे महामार्ग. ही लांबी पृथ्वीच्या ४० हजार किलोमीटर्स या घेरापेक्षाही मोठी आहे.

जगातील सर्वात मोठा म्हणजे साडेतीन किलोमीटर्स अंतराचा गोलाकार, वर्तुळाकार महामार्गांना एकत्र आणणाऱ्या चौक याच देशात 'पुत्रजया' येथे आहे. भगव्या रंगाची अंगावर पट्टे असणारी भली मोठी मांजर 'मलेशियन टायगर' म्हणून जगात प्रसिद्ध आहे. जगातील तिसऱ्या क्रमांकाचे रबराचे उत्पादन करणारा हा देश सर्वोच्च उंचीचे (२६५ फूट) 'तुलांग' जातीचा वृक्ष बाळगून आहे.सुप्रसिद्ध 'भू डिझायनर' जिमी चू हा देखील, मलेशियाचाच ज्याचा इंग्लंडच्या राणीने ऑर्डर ऑफ ब्रिटन देऊन गौरव केला होता. 'नासी लेमाक' हा नारळाच्या रसामध्ये शिजविलेला सुगंधी भात केळीच्या पानावर देण्याची या देशाची राष्ट्रीय परंपरा आहे. 'टी टारीक' म्हणजे मलेशियाचा चहा त्यांचे हे राष्ट्रीय पेयच म्हणाना. मात्र हा चहा सुमारे एक मीटर उंचीवरून, चहाचा एकही थेंब खाली न पाडता दुसऱ्या भांड्यात ओतण्याची कला अवर्णनीय आहे.

निसर्ग सौंदर्याने नटलेल्या या देशावर वरूणराजाची कृपा आहे. क्वालालंपूर सारख्या जगातल्या एकमेव शहरी जंगल असलेल्या भागामध्ये दरवर्षी किमान २०० दिवस तरी पाऊस पडतोच. सारवाकच्या कुचिंग भागात तर त्याहून अधिक म्हणजे अडीचशे दिवस पाऊस वर्षात होतो.क्रीडा क्षेत्रातही हा देश ओळखला जातो तो प्रामुख्याने बॅडमिंटन या खेळासाठी. या देशाचे महान बॅडमिंटनपटू सिडेक बंधू यांनी शोधलेला खेळातील सर्विसचा प्रकार. 'सिडेंक सर्व्हे' म्हणून प्रचलित झाला. प्रतिवर्षी या देशात पर्यटक भेट देण्याच्या संख्येत हा देश टॉप टेन मध्येच असतो. याची प्रमुख कारणे म्हणजे, पर्यटनाबाबतच्या सर्व सुविधा सोयी याकडे देशाने प्रामुख्याने लक्ष दिले आहे. रस्ते लांबलचक, प्रशस्त आहेत. वाहतूक कोंडी येथेही होते. मात्र त्यावर सातत्याने मार्ग काढण्यासाठी नवनवे प्रयोग केले जातात. स्काय ट्रेन, मेट्रो यासारखे उपाय वारंवार केले जातात.

असं म्हणतात की, मलेशियाच्या समुद्रधुनीत १५११ च्या सुमारास, पोर्तुगीज नौदलाचे 'फ्लोरा डे ला मार हे महागड्या, किंमती वस्तूंनी भरलेले जहाज बुडाले होते. ते जहाज व त्यातील किंमती वस्तू समुद्राच्या तळाशी अजूनही आहेत. त्यामुळे आजही त्या भागात समुद्री चाच्यांची गस्त कायम राहते. मलेशियाने भारतीय पर्यटकांसाठी आता मदतीचा हात पुढे केला आहे. 'व्हिसा फ्री' घोषणेनंतर भारतीयांना आणखीही काही सवलती जाहीर झाल्या आहेत. मलेशियन जायचे असल्यास किमान एका आठवड्याचा अवधी हवाच. मलेशियाची राजधानी क्वालालंपूर. पेट्रोनास टॉवर व्यतिरिक्त या शहरात अनेक गोष्टी पाहण्यासारख्या आहेत. पेनांग हे शहर चविष्ठ स्ट्रीट फूडसाठी आणि ऐतिहासिक महामार्गासाठी प्रसिद्ध आहे. मल्लाक्का जुन्या पारंपारिक युरोपियन आणि प्रामुख्याने पोर्तुगीज वसाहतींची आठवण करून देणारे शहर आहे. लंकावी शहर शॉपिंग पॅरडाईस म्हणून प्रसिद्ध आहे. बोर्निओ हे रेनफॉरेस्ट निसर्ग प्रेमींना आकर्षित करते. प्रसिद्ध ओरांग उटान किंवा अन्य वन्य जीवन यांचे दर्शन येथे घडू शकते. बोर्निओ रेनफॉरेस्ट प्रसिद्ध आहे. 'बटू केव्हज' या चुनकळीच्या गुंफा आणि त्यामधील भगवान मुरूगन देऊळ, यामुळे भारतीयांचे पाय या 'बटू कॅव्हजला' लागतातच. पेनांग हिल्स हायकर्सचे आकर्षण असून तेथे चहाचे मळेही आहेत. ऑर्किड व रॅफिलेशिया या जगप्रसिद्ध फुलांच्या बागाही पर्यटकांना आकर्षित करतात. सियाडेन आयलंडस्वर स्कूबा डायव्हिंगचा स्वर्ग आहे. तर नेगादा तमन हे आणखी एक जंगल शौकिनांना आकर्षित करते. कोरल रिफ किंवा प्रवाशांसाठी प्रसिद्ध असलेले पेरेंशन आयलंड्स आणि संपूर्ण मलेशियातील एकमेव कॅसिनो सिटी म्हणजे जेंटिन हायलंड्स शहरी पर्यटकांसाठी अलिबाबाची गुहाच आहे. चला तर मग मलेशियाला. **

# समानधर्मी तत्ववेत्त्यांचे मार्गदर्शक तत्वविचार

१२ जानेवारी ह्या तारखेचे महत्व, आमच्या वडिलांनी म्हणजेच महर्षी न्यायरत्न विनोदांनी, फार लहानपणींच आम्हाला आमच्या नकळत सांगितले. खरं म्हणजे महर्षी विनोदांचा तो जन्मदिवस पण स्वत:चा वाढदिवस साजरा न करता मला आठवतं तेव्हापासून हा दिवस ते विवेकानंद जयंती म्हणूनच साजरी करत असत. विवेकानंदाच्या तत्वज्ञानाचा सखोल अभ्यास केलेल्या उत्तम वक्त्यांचे जाहीर भाषण हे या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण असे. तरुण पिढीला विवेकानंदाच्या विचारधनाची ओळख करुन देणं हा त्यामागचा हेतू असे.

'भारतीयांनी वेदकालापासून जो 'विवेक' केला त्याचा जणू आविष्कार व अवतार म्हणजे विवेकानंद! असं महर्षी आवर्जून सांगत असत.


महर्षी विनोदांना विवेकानंदांचे विचार म्हणजे 'अमर आलेख' वाटत असत. आप्पा म्हणत 'विवेकानंदानी सर्व वैचारिक शक्तींचा समन्वय आणि बुद्धी व श्रद्धा यांच्यात परमोच्च प्रतीचा संवाद साधला.'

विवेकानंद 'राष्ट्रद्रष्टे महापुरुष' होते. 'राष्ट्रपूजक' होते व विश्वकुटुंबी' ही होते. विवेकानंदाच्या विचारांचा यथार्थ अभ्यास केलेली व्यक्तीच त्यांचे विचार इतक्या उत्तम प्रकारे वर्णन करु शकते!

महर्षी विनोद म्हणत, आजच्या क्षणाला विवेकानंदाचे 'spiritual Nationalism' व 'world patriotism' हे शब्द ही ध्येय प्रत्य `क तरुणाने आत्मसात केली पाहिजेत. Religion हा शब्द वापरतांना देखील 'अंतर्मुखता' व 'आंतरात्म्याकडे पाहण्याची दृष्टी' हे अर्थ विवेकानंदाना अभिप्रेत असत. भारतात अनेक धर्म, पंथ, भेद असले तरी भारत हे 'एकजिनसी राष्ट्र' आहे अशी विवेकानंदाची श्रद्धा होती. संपूर्ण भारताचा हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत आणि कराचीपासून कलकत्त्यापर्यंत अत्यंत अवघड परिस्थितीत प्रवास करुन स्वत: अनुभवलेल्या एकजिनसीपणावर त्यांची श्रद्धा आधारलेली होती. भारतीयांच्या धार्मिकतेतील अंतर्मुखतेचे मर्म त्यांनी जाणले होते.

विवेकानंदानी मृत्युसमयी दिलेला संदेश अजरामर आहे. आपण सर्वांनी तो काळजीपूर्वक अभ्यासला पाहिजे आणि त्यानुसार वागण्याचा प्रयत्नही करायला हवा.

"India is immortal if she persists in her search for god. but if she taken to politics and social conflicts she will die.' याचा महर्षी विनोदांनी सांगितलेला अर्थ लक्षात ठेवण्यासारखा आहे.



'भारत हा एक 'चिरंजीव' देश आहे. आध्यात्मिक अनुभूती देवाचा ध्यास हेच मानवी जीवनाचे ध्येय आहे. ही भावना जोपर्यंत भारतीयांच्या अंत:करणांत दृढ राहील. तोपर्यंत भारत अमर राहील. मात्र सामाजिक व राजकीय

**अॅड. अदिती वैद्य**

संघर्षावर तो स्वत:च्या शक्ती केंद्रीत करु लागला तर भारत नष्ट होईल. रसातळाला जाईल. आपले वैशिष्ट्यच नव्हे तर अस्तित्वही गमावून बसेल.

महर्षी विनोद म्हणत, 'श्रीविवेकानंदाचे हे अखेरचे शब्द म्हणजे तप्त ज्वालारसाने लिहिलेला अमर आलेख आहे. भारताची मूल प्रकृती भारताचा आत्मा, वैशिष्ट्य श्रीविवेकानंदाच्या या अमर वाणीत आहे. प्रत्येक भारतीयाने हा संदेश ग्रहण करावा. आपल्या श्वास प्रश्वासाबरोबर अखंडीतपणे जागृत ठेवावा.'

महर्षी न्यायरत्न विनोद हे विवेकानंद वारसदार मानले जात. स्वामी विवेकानंदांनी १९०१ मध्ये देह ठेवला. आणि १२ जानेवारी १९०२ ला महर्षी विनोदांचा जन्म झाला. महर्षी विनोदांनी स्वामी विवेकानंदांप्रमाणे १९५२ मध्ये सर्व धर्मपरिषदेचे पुनरुज्जीवन केले. टोकियोतील चार जागतिक सर्वधर्म परिषदांमधील महर्षींचे योगदान अत्यंत अर्थपूर्ण परिणामकारक व संस्मरणीय ठरले. विश्वशांती परिषदेमध्ये महर्षी विनोद यांची विश्वशांतीदूत म्हणून निवड करण्यांत आली.

महर्षी विनोदांनी १९५३ मध्ये पृथ्वी प्रदक्षिणा करुन विश्वशांतीदूत या नात्याने 'पृथ्वी प्रदक्षिणाची फलश्रूती' साधनासुत्रांतून प्रकट केली. त्यांनी विचार करुन ९ निष्कर्षात्मक सत्ये सांगून द्रष्टा असल्याची ग्वाही यात अंतर्भूत आहे हे नि:संशय स्वामी विवेकानंदाच्या अखेरच्या उद्गारांसारखीच मार्गदर्शक आहेत. म्हणूनच आत्मसात करावीत अशीच आहेत.

१) आपण राष्ट्रवादाच्या व वर्गवादाच्या मर्यादा ओळखल्या पाहिजेत.

२) आंतरराष्ट्रीय जीवन व जीवनांत अध्यात्म असलेली मूल्ये व मन:स्थिती या गोष्टी आता कल्पनासृष्टीत राहिलेल्या नसून वास्तवांत उतरल्या आहेत. अधिकाधिक उतरत राहणार.

३) अणुविज्ञानाच्या प्रगतीने मानवी संस्कृतीचा सर्वनाश प्रत्यक्ष कधीही होणार नाही. याबद्दल अनेक प्रमाणे व गमके आज उपलब्ध आहेत. अणुशक्तीचा उपयोग विद्यायक पद्धतीने सर्वोदयाला पोषक असाच यापुढे केला जाईल.

४) अतिमानसशास्त्र para psychology मनुष्यमात्रांच्या ठिकाणी प्रसुप्त अ-विकसित व अस्फुटीत असलेल्या अनेक शक्तींना प्रकट करुन मनुष्यमात्राच्या आंतरसिद्धी शतगुणीत करणार आहे.

५) वर्गवार व राष्ट्रवाद या मानवकुटुंबाच्या अविभाज्य एकतेकडे नेणाऱ्या सांस्कृतिक अवस्था आहेत. विशिष्ट मर्यादेपलिकडे त्याची अतिव्याप्ती व अतिचार झाल्यास मानवकुळाचा आत्मसंहार होऊ शकेल.

६) युद्धनिर्मूलन हे शक्यतेच्या कक्षेतील आहे.

७) जगत्शांतीचा उदय मानवमात्राने स्वत:चा हृदयपालट व क्रियापालट केल्याशिवाय होणार नाही. हा हृदयपालट प्रत्यक्ष प्रतीके व साक्षात उदाहरणे निर्माण झाल्याने होऊ शकेल. शाब्दीक प्रचार व वाक्यवार्तिके हा परिणाम घडवून आणण्यास असमर्थ ठरतील.

८) विशुद्ध विचार करता आल्याशिवाय उदात्त उदाहरणांची, प्रत्यक्ष प्रतीकांची ओळख अनुकार होत नाही. मूल्यदर्शन व महत्वमापन विशुद्ध विचिकित्सेशिवाय संभवनीय नसते.

९) प्रज्ञा, प्रतिभा, प्रतीक यांच्या समन्वित उपाययोजनेंत मानवी संस्कृतीच्या शांतीनिष्ठ पुनर्रचनेची बीजशक्ती आहे.

१२ जानेवारीला जन्मास आलेल्या या दोन महामानवांना विन्रम अभिवादन करुया. **

# आठवणींना उजाळा

गेली दहा वर्ष सातत्याने वाजत गाजत साजरे होणारे आमच्या मैत्रिणींचे गेट टुगेदर हा आता आमच्या सगळ्यांच्या अभिमानाचा विषय झालेला आहे खरोखरी.

एकदा ऑक्टोबर नोव्हेंबर उजाडले की आता कधी येताहेत सुषमा, संध्या? काय निरोप येतोय? आपल्याला काय काय व्यवधाने आहेत, फुरसद मिळणार आहे ना? इत्यादी प्रश्न सर्व सख्यांच्या मनात घोळू लागतात. यंदा कधी भेटायचे याची आतुरता मनात ओसंडून वाहते. दरवर्षी अलिबागलाच भेटतो आम्ही. यंदा थोडा बदल करावा, वेगळं ठिकाण निवडावे असा विचार केला. आम्ही अलिबागकरणीच ठरवतो नेहमी स्थळ आणि मेन्यू , तर या वर्षी वेगळ्या कोणाला ही जबाबदारी द्यावी असाही विचार केला. नावीन्य असेल तर मज्जा वाढेल असा विचार.

सुषमा आणि संध्या अमेरिकेत असतात. दरवर्षी त्यांची भारतभेट असते त्यात आमचे गेट टुगेदर हा ही एक महत्वाचा प्रोग्रॅम असतो. यंदा सुषमाशी माझा फोन झाला. तीन महिने आधी तिचा प्रोग्रॅम बहुधा ठरतो. त्याप्रमाणे भारत भेटीचा तिचा कार्यक्रम तिने कळवला आणि आपल्या तारखा सांगते लवकरच म्हणाली. तिच्या तारखा आल्या. ग्रूपवर उत्साहाला उधाण आले. याच संदर्भात वासंतीचा फोन आल्यावर मी तिला यावर्षी तू बघतेस का, घेतेस का जबाबदारी विचारले. तिनेही तत्पर होकार दिला. काही दिवसात तिचे माहितीपर फोन येत होते. चर्चा होत होत्या आणि मी तिला संपूर्ण रुकार दिल. त्यानंतर कर्जत जवळच्या 'चे नाव नक्की झाले. वासंती या मॅनेजमेंटबरोबर सतत संपर्क साधून होती. आता सर्वांच्या आवडीनिवडी आम्हाला माहितीच आहेत. त्या लक्षात घेऊन तिने दोन, तीन जेवण, चहा स्नॅक्स सगळे सगळे सुंदर प्लॅन केले.

या सगळ्या औपचारिक गोष्टी तर होतच राहतात. विषय असतो तो प्रत्येक भेटीच्या आनंदाचा.ठाणेकर, मुंबईकर, उरण पनवेलकर, पुणेकर आणि अलिबागकर सगळ्याच्या जोड्या जमल्या. गाड्या ठरल्या, वेळा ठरल्या. बॅगा पटापट भरल्या.

अलिबागकर मैत्रिणी मात्र उदास झाल्या. आदल्याच दिवशी ग्रुपमध्ये चैतन्य आणणारी सखी सुलभा खोल दु:खात बुडाली. तिचा सर्वात धाकटा भाऊ अचानक या जगाचा निरोप घेऊन गेला. आम्हीही सगळ्या हादरलो. केवळ सुषमा इतक्या लांब आलीय, तिची भेट आणि वासंतीने केलेले बुकींग यामुळे बेत रद्द केला नाही. जड मनाने निघालो. सकाळी जशा जशा गाड्या प्रवासाला लागल्या ग्रुपवर, 'निघालो ग आम्ही' असे मेसेजेस सगळ्या उत्सुक ;चेहऱ्यांच्या फोटोसहित येऊ लागले. मनाने आम्ही पोहोचलो केव्हाच.

प्रत्यक्ष वर गेलो आणि निसर्गरम्य जागा पाहून खुशच झालो. चारही बाजूंनी डोंगरांनी वेढलेले रिसॉर्ट. आजूबाजूच्या हिरवाई मध्ये शुभ्र रंग लेवून उभ्या असलेल्या खोल्या, निळा स्विमिंग पूल... वाह. मस्त जागा. एकेक गाडी आली, गळाभेटी झाल्या. आपापल्या खोल्यांचा ताबा घेऊन बॅग ठेवून सगळ्या पुन्हा बाहेर. वर्षभराची साठलेली गप्पांची मोटली सुटली. नुसता कलकलाट. शेजारी बसलेल्या, पलीकडे जरा असलेल्या सख्या चिवचिवाट करण्यात गुंतल्या. दुरून ऐकणाऱ्या माणसाला एक शब्द काही कळणार नाही पण आम्हाला अगदी नेमके बोलणे कळत होते. तोंड सुरूच प्रत्येकीचे. काय सांगू, किती सांगू अशी अवस्था.

**वर्षा कुवळेकर**

वर्षभराची साठलेली गप्पांची मोटली सुटली. नुसता कलकलाट. शेजारी बसलेल्या, पलीकडे जरा असलेल्या सख्या चिवचिवाट करण्यात गुंतल्या. दुरून ऐकणाऱ्या माणसाला एक शब्द काही कळणार नाही पण आम्हाला अगदी नेमके बोलणे कळत होते. तोंड सुरूच प्रत्येकीचे. काय सांगू, किती सांगू अशी अवस्था.

यथावकाश खाणे पिणे अधूनमधून सुरू. अलिबागहून सुरेखा आठवणीने बोरं घेऊन आली होती. सगळ्या लहान झाल्या.

आपापली खोली सोडून दुसरीकडे फिरण्यात दुपार गेली. चार नंतर जवळच्या योगेश्वरी देवीचे दर्शन घ्यायचे ठरले होते. तशा निघालो. रस्ता चुकवून महालक्ष्मीने आधी बोलावले. तिचे दर्शन घेऊन योगेश्वरी देवीकडे गेलो. खूप प्रसन्न वाटले. देवीच्या सभा मंडपात बसलो. ही देवी स्वयंभू आहे. तिची दृष्टांत मिळाल्यापासून प्रतिष्ठापना होईपर्यंतची साद्यंत माहिती ऐकली. तिथेच सुष्माने कधीच न ऐकलेले एक सुंदर देवीचे गाणे म्हटले. सगळे वातावरण भक्तिमय झाले.परत आल्यावर मधल्या अंगणात महफिल जमली. गाणी जोरात. पण थंडी कडक. बाहेर बसावेसे तर वाटत होते पण कुडकुडत बसण्यापेक्षा एका मोठ्या खोलीत डेरा जमला. मग जुन्या आठवणींचा पेटारा खुलला. मनसोक्त त्यात डुंबत होतो. एक वाजून गेला, मग नाखुशीने झोपायला पांगलो.

सकाळी उठून अंथरूणावर पडूनच गप्पा सुरू केल्या तर ताबडतोब दार वाजले.'उठलात ना, दार उघडा.' शुभाची ललकारी.

म्हटलं, 'काय कान लावून होतीस की काय दाराला?' पाठोपाठ एकेक जणी उगवत गेल्या. चहा नाश्ता करून कालपासून खुणावत असणाऱ्या पूलकडे पळालो. तयारीत आलोच होतो . मग पुढील दोन तास पाण्यात धमाल. एकमेकींना मदत करून पाण्यात घेणे,आणि मग मज्जा. ज्यांना शक्य नव्हते त्या बाजूला बसून मनाने सामिल. अशी एकतानता दुर्मिळ गोष्ट आहे बरं का!

त्यानंतर मात्र महत्वाचा समारंभ होता. योगायोगाने वासंतीचा वाढदिवस आजच. त्याचे तर व्हायलाच हवे होते. मात्र तिने आधीच माझा सत्कार करायचे योजले होते. माझ्यासाठी ते होते.

वसंतीचे मन भरून आले वाढदिवस साजरा होताना. माझेही तसेच. माझ्यासाठी हा सर्वात हृद्य सोहळा होता. जीवाच्या मैत्रिणींनी आपुलकीने केलेलं हे कौतुक खूप भारीच. अलका भरभरून बोलली. छान समारंभ झाला.

दरवर्षी एक काहीतरी वेगळा कार्यक्रम आम्ही ठरवतोच. यंदा हा घडून आला.

जेवणे झाली. परतीचे वेध लागले. बॅगा भरल्या, पाय जड झाले. आता पुन्हा वर्षाने भेट. वय आपले अस्तित्व दाखवते आहे. काही न काही प्रश्न तब्येतीचे आहेत. काही मोठे, काही लहान. कुणाचे गुडघे दुखत आहेत, ऑपरेशन आहेत. जोडीदाराचे प्रकृतीचे प्रश्न आहेत. वेगवेगळ्या दुखण्याना तोंड देणे चालले आहे.

एकदोघी मैत्रिणी कायमच्या निघून गेल्या. आज भेटल्या सख्या, सगळ्यांवर मायेची फुंकर घातली गेली जणू. निघताना मिठी मारली आणि आता पुढील वर्षी म्हटल्यावर सगळ्याचे डोळे पाणावले. भविष्यात काय दडले आहे माहिती नाही. आम्ही मात्र भेटणार एकमेकींना. जोपर्यंत प्रकृती साथ देते आहे तोवर आम्ही भेटणार एकमेकींना, एक दिवस राहणार सोबतीने. तो सगळ्यात मोठा आनंद आहे आता आमचा.

वर्षभराची ऊर्जा घेऊन सगळ्या आपापल्या घरी परतलो. पोहोचले ग सुखरूप अशी ग्रुपवर माहिती आवर्जून आली.

दोन दिवस झाले. फोटो बघण्यात सगळ्या गुंतलेल्या आहेत. आठवणीत रमल्या आहेत. मदन आमची आजारी आहे. डॉक्टर प्रवास करायला नाही म्हणाले. ती रडत होती, फोन करत होती. सगळ्या उदास झाल्या. भेटू आपण तिला असं प्रत्येकीला वाटले.

या आतून वाटणाऱ्या प्रेमापेक्षा आता या वयात. काय हवे अजून? भेटूच लवकरच सख्यांनो. **

# गणिती सुत्रे भाग २

आकडेमोड
राजेंद्र पाटील
९८२२३०२०८५

"संपूर्ण विश्व एकच गणित आहे. प्रत्येक घटक त्यात सामील आहे" हा सुविचार आपण शालेय जीवनात अनेक वेळा ऐकलेला आहे. गणिताच्या रचनात्मक आणि तर्कशक्तीच्या विश्लेषणात सखोल विचार आणणे, त्यातून जीवनाच्या तत्वज्ञानाला जोडणे हा एक सुंदर दृष्टीकोन असू शकतो. गणित सूत्रांचा वापर करून गणित या विषयामध्ये आपण पारंगत होऊ शकतो.

गणित विषयासाठी गणित स्पर्धांसाठी, गणित विषयांच्या स्कॉलरशिप, बुद्धिमत्ता परीक्षेसाठी, आणि दैनंदिन गणिती व्यवहारासाठी गणिती सूत्रे फार महत्वाची आहेत. जो विद्यार्थी व जो शिक्षक या सुविचाराप्रमाणे काम करेल तो हमखास गणित व बुद्धिमत्ता विषयात यशस्वी ठरल्याशिवाय राहणार नाही.

गणित हा अत्यंत महत्वाचा आणि व्यापक विषय आहे. जो आपल्या दैनंदिन जीवनाच्या अनेक क्षेत्रामध्ये लागू होतो. गणिती सूत्रे म्हणजे गणितीय समस्यांचे सोडवणूक करण्यासाठी वापरली जाणारी संक्षिप्त, सुबोध आणि प्रमाणितपध्दत. प्रत्येक गणिती सूत्र आपल्या विशिष्ट समस्येचे सोडवणूक साधते आणि त्याला एक साधी आणि सुसंगत रूपरेषा प्रदानकरते.

या लेखात स्कॉलरशिप परीक्षेत उपयोगी पडतील अशी काही महत्वाची सूत्रे देण्याचा प्रयत्न केला आहे. जेणेकरून आपल्या विद्यार्थ्यांचे गणित आणि बुद्धिमत्ता या विषयाचे गुणवाढविता येतील. (या सुत्रांमध्ये काही चुका असू शकतात)

० हा अंक असणाऱ्या १ ते १०० मधील संख्या –१०, ० हा अंक १ ते १०० संख्यामध्ये ११ वेळा येतो.

१ ते ९ यापैकी प्रत्येक अंक असणाऱ्या १ ते १०० मधील संख्या– १९, १ ते ९ या पैकी प्रत्येक अंक १ ते १०० मधील संख्यांमध्ये २० वेळा येतो.

मूळ संख्या – २,३,५,७,। ११,१३,१७,१९,। २३,२९,। ३१,३७,। ४१,४३,४७,। ५३,५९,। ६१,६७,।७१,७३,७९,।८३,८९,।९७ (एकूण २५ संख्या)

१ ते १०० मधील संयुक्त संख्या एकूण ७४.१ ही संख्या मूळही नाही, संयुक्तही नाही.

**गणिती क्रियांचा क्रम**

सर्वात आधी कंस सोडवायचा, नंतर गुणाकार,/ भागाकार व शेवटी बेरीज/ वजाबाकी करावी.

बेरीज/ वजाबाकी अथवा गुणाकार/ भागाकार या क्रिया एकत्रित आल्यास डावीकडील क्रिया आधी करावी.

१० ने गुणणे म्हणजे गुण्य संख्येच्या शेवटी १ शून्य वाढविणे. ४५८ गुणीले १० बरोबर ४५८०, तसेच १०० ने गुणणे म्हणजे २ शून्ये वाढविणे उदा ४५८ गुणीले १०० बरोबर ४५८००.

१० ने भागताना भाज्यातील एकक स्थानचा अंक बाकी दर्शवितो, इतर सर्व अंकांनी तयार झालेली संख्या भागाकार दर्शविते. ४५८ भागिले १० : भागाकार ४५, बाकी ८.१०० ने भागताना भाज्यातील एकक व दशक स्थानावरील अंकांपासून तयार झालेली संख्या बाकी दर्शविते, तर इतर सर्व अंकांनी तयार झालेली संख्या भागाकार दर्शविते. ४५८ भागिले १०० : भागाकार ४, बाकी ५८.

समान छेद असलेल्या अपूर्णांकांची बेरीज/ वजाबाकी करताना अंशांची बेरीज/ वजाबाकी करावी, छेद, तसाच कायम ठेवावा.

समान छेद असलेल्या अपूर्णांकांमध्ये ज्याचा अंश मोठा तो अपूर्णांक मोठा व ज्याचा अंश लहान तो अपूर्णांक लहानः उदा २/५, ४/५, १/५ या अपूर्णांकामध्ये ४/५ हा अपूर्णांक सर्वात मोठा व १/५ हा अपूर्णांक सर्वात लहान.

समान अंश असलेल्या अपूर्णांकांमध्येज्याचा छेद छोटा तो अपूर्णांक मोठा व ज्याचा छेद मोठा तो अपूर्णांक लहानः उदा५/२,५/३,५/१ या अपूर्णांकामध्ये ५/१ हा अपूर्णांक सर्वात मोठा व ५/३ हा अपूर्णांक सर्वात लहान.

१/२, २/३, ३/४ या अपूर्णांकांमध्ये ३/४ हा अपूर्णांक सर्वात मोठा तर १/२ हा अपूर्णांक सर्वात लहान.

अपूर्णांकाचे रुपांतर दशांश अपुर्णांकामध्ये करताना

अपूर्णांकाचा छेद १०,१००,१००० असायला हवा, नसेल तर १०.१००.१००० छेद असलेला समम ूल्य अपूर्णांक शोधा १/२ = १X५/२X५=५/१०, १२/२५= १२X४/२५X४=४८/१०० इत्यादी.

यानंतर छेदातील १ च्या पुढे जेवढी शून्ये तेवढे अंक दशांश चिन्हापुढे असायला हवेत. अंशांमध्ये तेवढे अंक उपलब्ध नसल्यास अंशातील अंकांच्या डावीकडे तेवढी शून्ये लिहावीत.

उदा ७/१०० = ०.०७ (छेदात १ पुढे दोन शून्ये, अंशात एकच अंक, म्हणून एक शून्य सातच्या डावीकडे वाढविले ) ४५७/१० = ४५.७ (छेदात १ पुढे एक शून्य अंशात तीन अंक, म्हणून दशांश चिन्ह एक अंक दशांश चिन्हापुढे राहील अशाप्रकारे)

आकृतीवरून अपूर्णांकाचे वाचन करताना, आकृतीचे समान भाग झाले आहेत ते पहा.

अंशाधिक अपूर्णांकाचे पूर्णांकयुक्त अपूर्णांकात रुपांतर :

अंशाला छेदाने भागा, भागाकारपूर्णांकस्थानी लिहा, बाकी अंशस्थानी लिहा, छेद तोच कायम ठेवा. उदा १७/५=३२/५ (१७ भागिले ५, भागाकार ३, बाकी २)

पूर्णांकयुक्त अपूर्णांकाचे अंशाधिक अपूर्णांकात रुपांतर :

पुर्णांकाला छेदाने गुणून त्यात अंश मिळवा, येणारी संख्या अंशस्थानी लिहा, छेद तोच कायम ठेवा. उदा. ३२/५= १७/५ (३ गुणीले ५ अधिक २ बरोबर १७, अंश १७, छेद ५ )

अपूर्णांकाला अतिसंक्षिप्त रूप देताना अंश व छेद यांच्यातील समान अवयव (अशी संख्या की जिने अंश व छेद दोघांनाही भाग जातो) शोधा, समान अवयव अंश व छेद यातून रद्द करीत उजा. ज्यावेळी अंश व छेद यांच्यात कोणताही समान अवयव उरणार नाही ते अपूर्णांकाचे अतिसंक्षिप्त रु.

३६/४८ = २X१८ /२X२४ = १८/२४ = २X९/२X१२ = ९/१२ = ३X३/३X४ = ३/४

१० मिमी= १ सेमी, १०० सेमी = १ मी, १००० मी = १ किमी

१००० ग्रॅम = १ किलोग्रॅम, १००० मिलीलीटर = १ लिटर

१०० पैसे = १ रुपया

६० सेकंद= १ मिनिट, ६० मिनिटे= १ तास, २४ तास= १ दिवस, ७ दिवस= १ आठवडा, ३६५ दिवस = १ वर्ष, १२ महिने= १ वर्ष.

२४ ताशी घडाळ्यात, दुपारचा १ म्हणजे १३, दुपारचे २ म्हणजे १४, .......... रात्रीचे १० म्हणजे २२ इ. (१२ मिळवा.)

३१ दिवशी महिना = ४ आठवडे + ३ दिवस, ३० दिवशी महिना= ४ आठवडे+२ दिवस, २९ दिवशी महिना = ४ आठवडे+१ दिवस, २८ दिवशी महिना= ४ आठवडे.

३१ दिवशी महिन्यांत १,२,३ तारखांचे वार ५ वेळा येतात, ३० दिवशी महिन्यांत १,२ तारखांचे वार ५ वेळा येतात, २९ दिवशी महिन्यांत १ तारखेचा वार ५ वेळा येतो, २८ दिवशी महिन्यांत कोणताच वार ५ वेळा येत नाही.

महिन्यांत १,८,१५,२२,२९ या तारखांना सारखे वार येतात, महिन्यांत २,९,१६,२३,३० या तारखांना सारखे वार येतात (७ चा फरक)

लीप वर्ष दर चार वर्षांनी (४ ने पूर्ण भाग जाणारे वर्ष) लीप वर्षात फेब्रुवारीला २९ दिवस (एरवी फ ेब्रुवारीला २८ दिवस)

वर्ष लीप नसेल तर १ जानेवारीला जो वार येत्तो तोच वार त्या वर्षाचं ३१ डिसेंबरला येतो, लीप वर्ष असेल तर ३१ डिसेंबरचा वार १ जानेवारीच्या वरापेक्षा १ ने अधिक असतो.

दोन्ही बाजूंनी मर्यादित, असलेली रेषीय आकृती म्हणजे रेषाखंड, एका बाजूने मर्यादित तर दुसऱ्या बाजूने अमर्यादित असलेली रेषीय आकृती म्हणजेकिरण

दोन्ही बाजूंनी अमर्यादित असलेली रेषीय आकृती म्हणजे रेषा.

काटकोनापेक्षा लहान कोन लघुकोन, तर काटकोनापेक्षा मोठा कोन विशालकोन.

ज्या त्रिकोणाच्यातीनही बाजू समान असतात त्या त्रिकोणाला समभूज त्रिकोण म्हणतात, समभूज त्रिकोणाचे तीनही कोन लघुकोन (६० मापाचे) असतात.

ज्या त्रिकोणाच्या दोन बाजू समान असतात त्या त्रिकोणाला समद्विभूज त्रिकोण म्हणतात.


चौरसाच्या चारही बाजू समान, तर चारही कोन काटकोन असतात.

आयताच्या समोरासमोरीलबाजू समान तर चारही कोन काटकोन असतात.

समभूज चौकोनाच्या चारही बाजू समान असतात, समोरासमोरीलबाजू समांतर असतात.

समांतरभूज चौकोनाच्या समोरासमोरीलबाजू सम ान व समांतर असतात.

पतंगाच्या शेजारील बाजू सारख्या असतात.



ओ हे वर्तुळ केंद्र, एबीहा व्यास, ओसी ही त्रिज्या(ओए व ओबी याही त्रिज्या,) डीइ ही जीवा, व्यास ही वर्तुळाची सर्वात लांब जीवा, व्यास बरोबर त्रिज्या गुणीले २.

आकृतीचे दोन समान व एकावर एक जुळणारे भाग करणाऱ्या रेषेला आकृतीचा सममिती अक्ष असे म्हणतात.

परिमिती

समभूज त्रिकोण : ३ गुणिले बाजू

इतर त्रिकोण : बाजूंचे बेरीज

चौरस, समभूज चौकोन : ४ गुणिले बाजू

आयत : २ गुणिले लांबी अधिक २ गुणिले रूंदी

**

# 'कोकणची भजनसंस्कृती जपूया...'

धनंजय शेटये

कोकण ही कलावंतांची भूमी आहे. आपल्या कोकणच्या लाल मातीत संगीतपरंपरेचा वारसा जपत आपल्या कोकणचं नाव सातासमुद्रापारगेलेतेकोकणच्यादेदीप्यमानअशाअनेक प्रतिभावंत कलावंतांच्या शिस्तबद्ध, संस्कारसंपन्न कर्तृत्वाने! संगीतकार वसंत देसाई, लक्ष्मीकांत कुडाळकर (संगीतकार लक्ष्मीकांत – प्यारेलाल जोडीतील) ही रत्न आमच्या कोकणातील परंपरागत भजन संस्कृतीतुनच उदयाला आली होती. संगीत क्षेत्रात गुरुवंदना, मानसन्मान, शिस्तबद्धता आणि संस्कार या गोष्टीही तितक्याच महत्वाच्या असतात. सरस्वती मातेचा आशीर्वाद लाभणं हे यासर्व गोष्टींचं फलित असतं. आपल्या कलेवर नितांत प्रेम करणारे कलावंत आपल्या कलेला दैवतासमान मानतात. आजकालच्या कलावंताना कधी याचा विसर पडू नये.



डबलबारीभजन संस्कृतीची परंपरा जपताना अलिकडच्या काळात काही प्रमाणात वैयक्तिक टिका टिप्पणी करताना खूपच खालच्या पातळीवर आणि खूपच खाजगी गोष्टींचा उल्लेख करुन एकमेकांची उणीधुणी काढताना समस्त भजनप्रेमीं श्रोत्यांचे माताभगिनींच्या उपस्थितीचे भान ठेवत नाहीत. कोणत्या गोष्टींसाठी आपण आलो आहोत? आणि आपण काय करत आहोत ?याचे भान नसेल तर मुखी हरिनाम तरी मनापासून असेल का? श्रोते जनांच्या मनात हरिनामाची गोडी निर्माण करुन गायनाच्या सोबत वाद्यांच्या साजसंगतीने थकल्या भागल्या मनाला मनोरंजनाचे आनंदी क्षण उपलब्ध करून देण्यासाठी भजन असायला हवे. आध्यात्मिक वारसा जपत संतांनी निर्माण केलेल्या परंपरा, रितीरिवाज, संस्कृती यांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी हरिनामाच्या गोडीने लोकांना संस्कार देत प्रबोधन करत राहणे गरजेचे आहे. आजच्या काळात ढासळत चाललेली नैतिकता, दुर्लक्षित होणारे सामाजिक बांधिलकीचे महत्त्व त्यामुळे मनोरंजनाच्या माध्यमातून भावीपिढीला अध्यात्माचे महत्त्व पटवून देणे गरजेचे आहे.आजच्या प्रसारमाध्यमांनी जग अगदी आपल्या जवळ आणून ठेवले आहे. त्यामुळे मनोरंजनाच्या गरजा सुद्धा नाटक, चित्रपट, टेलिव्हिजन, मोबाईल फोन द्वारे पूर्ण होत आहेत.त्यामुळे मनोरंजनाच्या या माध्यमातून प्रबोधन करताना अनेक अडचणी, समस्या निर्माण होताना दिसत आहेत.बऱ्याबरोबर वाईट गोष्टी सुद्धा शेतातल्या तणाप्रमाणे वाढत आहेत. मग जनसामान्यांच्या प्रबोधनाच्या माध्यमातून नेमकं चांगले संस्कार करायचे कसे? हा मोठा बिकट प्रश्न उभा राहिला आहे. मग परंपरागत भजन गायनाच्या माध्यमातून फक्त आणि फक्त संगीतकलेसोबत आध्यात्मिकतेच्या राजमार्गावरुन आज तरुणाईच्या मनात कोकणच्या भजनी संस्कृतीचं आकर्षण निर्माण झाले आहे. भजनसम्राट चंद्रकांत कदम, भजनसम्राट परशुराम पांचाळ, भजनसम्राट वामन खोपकर, भजनसम्राट विलास पाटील बुवा अशा भजनी बुवांनी संतांनी सांगितलेल्या आध्यात्मिकतेतून मार्गाने भजनाच्या माध्यमातून लोकप्रबोधन केले आहे.कित्येक दिवस या महान भजन गायकांनी कोकणच्या लाल मातीत अवतरलेली ही भजनीपरंपरा आबालवृद्धांच्या मनावर अधिराज्य गाजवू लागली. मुंबई गजबजलेल्या नगरीत ८० –९०दशकात गिरणगावात गिरणी कामगारांच्या थकल्या भागल्या मनाला पौराणिक कथा, आध्यात्मिक भक्तीमय वातावरणात भजनसंगीताच्या माध्यमातून प्रबोधन, मनोरंजन करुन आनंद निर्माण केला.लोकांना डबलबारींचं आकर्षक निर्माण होऊ लागले. रुपावली, गजर, गवळण,भारुड अशा संतांच्या अजरामर साहित्याला जनसामान्यांच्या मनात आपुलकीचे स्थान मिळवून देण्यासाठी भजन गायनाच्या मार्गाने संगीत कलेचा शास्त्रीय साज वृद्धिंगत केला. ज्येष्ठ–कनिष्ठ तसेच नवोदित भजनीबुवा परंपरागत भजन कलेच्या माध्यमातून प्रबोधन करीत सुसंस्कृतपणाचे संस्कार घडविण्यासाठी प्रयत्न कले. आज गावोगावीच्या तरुणाईच्या मनात भजन गायन, पखवाज वादन, झांज वादन शिकण्याची इच्छा निर्माण झाली.कोकणच्या महान भजनीबुवांनी अतिशय तळमळीने,अथक परिश्रम करुन डबलबारीभजनी संस्कृती टिकवून ठेवली. पूर्वीच्या काळी मानधन सुपारी ती कसली? कोकण रेल्वे सुरू होण्यापूर्वीच्या काळात तरी एसटी बसने भजन मंडळ गावोगावी घेऊन जात होती. खर्चाचा ताळेबंद कसा साधायचा? हा प्रश्न असायचा. नोकरी सांभाळून कधी कलेसाठी दांडी मारुन डबलबारीसाठी जात असत. तरी डबलबारी करणारे हौशी बुवा नोकरी, कामधंदा सांभाळून भजनपरंपरा समृद्ध करण्यासाठी झटत होते. दिग्गज भजनसम्राटांच्या योगदानामुळे आज डबलबारी परंपरेला सोनेरी दिवस आले आहेत. या दिग्गज भजनसम्राटांचे योगदान विसरुन चालणार नाही. त्या दिग्गज भजनसम्राटांचे डबलबारीत शाब्दिक चकमक होत असली तरीही आपापसात सलोख्याचे संबंध असायचे. डबलबारीमध्ये मनोरंजन करताना एका विशिष्ट मर्यादेपर्यंत एकमेकांवर टिका टिप्पणी केली जायची. एकमेकांच्याप्रती संयम होता, आदरभाव होता, भजनपरंपरा समृद्ध करण्यासाठीची तळमळ होती. आजकालच्या डबलबारीमध्ये घसरत चाललेली नैतिकता भजनसंस्कृतीला कुठे घेऊन जाईल? यांची खंत वाटते.चालू बारी दरम्यान आपाआपसातील वैयक्तिक हेवेदावे, अश्लिल टीका, टिप्पणी कशाला हवेत? उत्तम शास्त्रीयगायन,वादन, अर्थपूर्ण व्यासंगी बतावणी, उत्तम शब्दसाज असलेली काव्यरचना असेल तर भजनपरंपरा आणखी समृद्ध होईल.आजकालच्या डबलबारीमधील काही ठराविक बुवांच्या अशा वर्तणुकीमुळे सुसंस्कृत भजनी परंपरेचं अशा पद्धतीने होत असलेले अधःपतन पाहून मनाला दुःख होते. हे कुठेतरी थांबायला हवे. आपली ही कोकणची भजनी परंपरा आपण जपायला हवी.**

# प्रेम दुणे प्रेम


निलेश साठे

या दुनियेतील काही माणसं अतिशय भाग्यशाली असतात. त्यांना सच्चे आणि खरं प्रेम लाभतं. त्यांना प्रेमाशिवाय दुसरं कशाचं भान नसतं. जात–पात धर्म पंथ परिस्थिती वेळ काळ कशाचा कशाचा ते विचार करत नाहीत. ते प्रेमामध्ये अकंठ बुडून गेलेले असतात. प्रेमात पडलेले प्रेमी युवक अतिशय दयाळू प्रेमळ स्वभावाने शांत असतात. त्यांची कधी चिडचिड होत नाही. कारण त्यांना जे हवं असते ते मिळालेले असतं. त्यामुळे त्या प्रेमी युगालांमध्ये भांडणे सुद्धा होत नाहीत. आणि कधी चुकून झालीच तर फार थोड्या वेळासाठी होतात. थोड्यावेळाने लगेच त्यांच्या मध्ये सामंजस्य करार होतो. कारण ते दोघे समजदार असतात. लढाई झगडा करून काही हासिल होत नाही हे त्यांना माहीत असतं. त्यांना प्रेमाने जग जिंकायचं असतं. ते मोठ्या मनाचे बडे दिलवाले असतात.

प्रेमाचे गीत गात राहायचं आणि हे जीवन अतिशय शिस्तीत आणि आनंदाने जगायचं एवढेच त्यांना माहीत असतं. त्यांना कुणाशीच लढाई झगडा करायचा नसतो. त्यांना प्रेम द्विगुणित करायचं असतं. प्रेमाच्या बदल्यात प्रेम देणे एवढेच त्यांना माहित आहे. राग हेवेदावे तिरस्कार हे त्यांच्या गावीही नसते. त्यांना फक्त प्रेम द्यायचं आणि प्रेम घ्यायचं आणि ते वाढवायचं एवढाच माहित असतं. तुम्ही त्यांच्यावर जीव लावला की ते तुमच्यावर डबल जीव लावतील. त्यांनी प्रेमाचा पाढा वाचलेला आहे, जगलेला आहे प्रेम एके प्रेम...प्रेम दुणे प्रेम एवढेच त्यांना माहित.

असे म्हणतात की, माणसाने एकदा तरी प्रेमात पडावं. तुम्ही प्रेमात पडाल, पण तुमच्यावर कोणीतरी जीवापाड प्रेम करायला भेटलं पाहिजे ना. म्हणून प्रेम फक्त नशीबवाल्यांनाच मिळतं.

जर तुम्हाला तुमचं सच्चे प्रेम मिळालं असेल तर तुम्ही दुनियातले अतिशय भाग्यशाली व्यक्ती आहात. देवाची तुमच्यावर विशेष कृपा आहे हे खुशाल समजून जा. कितीतरी तरुण प्रेम मिळवण्यासाठी जीवाचा आटापिटा करत असतात. नस्ती उठा ठेव करत असतात. एकतर्फी प्रेम करत असतात. तुमच्या भावना तुमच्या फिलिंग समजून घेणारी समोरची व्यक्ती नसेल तर त्या प्रेमाला काय अर्थ. तुमचा स्वभाव जुळला पाहिजे विचार जुळले पाहिजेत दोन्ही बाजूने एकमेकांविषयी ओढ निम ‍र्ण झाली पाहिजे. तुमचे आत्ममिलन झाले पाहिजे. ते सर्वोच्च प्रेम आहे. हे ज्यांना मिळतं ते केवळ भाग्यशालीच.



प्रेमाची बदलणारी परिभाषा पुढील अंकात. **

## वाचनीय आणि वास्तववादी

# दास्तान

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

"दास्तान" ही डॉ. प्रतिमा इंगोले यांची कादंबरी मायबोली अध्ययन अंतर्गत सोनल प्रकाशनने देखण्या रूपात प्रकाशित केली आहे.सुरुवातीला लेखिकेचे सविस्तर 'मनोगत' वाचावयास मिळते. ही कथा एका गावाची कहाणी असली, तरी ती आपल्या देशाचीही प्रातिनिधिक कहाणी आहे. हिंदू–मुसलमान संघर्ष कमीजास्त प्रमाणात गावोगावी असतो. मात्र काही आदर्श गावांत हिंदू–मुसलमानांचे देव एक असतात. या गावातील मियाँबाबाला हिंदू–मुसलमान नवस करीत होते. परंतु आता हे दिसत नाही. संघर्ष पेटता राहतो. कारण राजकारणी मंडळींना हा सलोखा नको असतो. या कादंबरीतील शंकर हा स्वार्थ न पाहता गावाचे भले पाहतो. त्याला खरे परिवर्तन हवे असते. या कहाणीला सत्याचा आधार आहे. ही कादंबरी वाचून समाजाने काही बोध घ्यावा, शिकावे, अशी अपेक्षा लेखिकेने व्यक्त केली आहे. "दास्तान" या फारसी शब्दाचा अर्थ कहाणी अथवा विस्तृत माहिती. १९२० ते १९३०च्या दशकातील ही कहाणी असावी. मात्र हा प्राथमिक इतिहास विस्मृतीत गेला आहे. पुण्याच्या मनोज संत यांचे रंगीत मुखपृष्ठ या पुस्तकाकडे वाचकाला आकृष्ट करते. ही कादंबरी छोट्या मोठ्या बत्तीस प्रकरणांतून वाचकांसमोर उलगडते आहे.




सातपुड्याच्या छायेत वसलेले बावऱ्या गाव हे पुरातन होते. द्वारका बुडाली तेव्हा दुफळी माजल्याने यादव पांगले. बहुतेक विदर्भात आले. पूर्वी हा गाव गवळ्यांचा गाव म्हणून प्रसिद्ध होता. तटबंदी असलेल्या या गावाला उत्तर–दक्षिणेला महाद्वार होते. कालांतराने गवळ्यांची वस्ती नष्ट झाली सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात मुस्लिमांचे आक्रमण झाले. त्यावेळी गावातले महादेवाचे मंदिर गायब झाले. गावातील दोन विभागात मराठे आणि अन्य विविध जातींचे लोक राहत होते. गावाला गढीविषयी आदर होता.नदीच्या पूरकाळात सर्वसामान्य लोक गढीच्या आश्रयास येत असत. गावात तिळाचं पीक मोठ्या प्रमाणात काढले जाई. 'घाणीचे गाव' म्हणूनही हे गाव प्रसिद्ध होते. गढीवरील तीन भाऊ आणि त्यांच्या परिवाराविषयी गावाला आदर वाटत असे. गाव पांडुरंगाचे भक्त होते. त्यामुळे गावात कोणी जातिभेद पाळत नव्हते. मनाजी पाटील दरवर्षी वारीवरून आले की, गावात जणु जत्रा भरत असे. त्यावेळच्या गाव जेवणात हिंदू–मुसलमान सामील होत असत. त्यावेळी विविध नवसही बोलले जात.

गावातील दोन विभागांत विविध जातींचे लोक राहत होते. ते सर्व गढीचा सन्मान जपत असत. बलुतेदारीमुळे सर्व आपापली कामे करून मोबदला वस्तुरूपात प्राप्त करत होते. गढीवरील मनाजी पाटील यांच्याविषयी सर्व हिंदू–मुसलमान गावकऱ्यांना अतीव आदर होता. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धातील नोंदणीबुकात गावाचे वर्णन होते. फार पूर्वी मुसलमान आल्यावर गावातील शंकराचे देऊळ गायब झाले होते. गावात मस्तानशहा मियाँचा दर्गा होता. मियाँबाबाचे हिंदू आणि मुसलमान शिष्य होते. दर्गा म्हणजेच महादेवाचे देऊळ होते, असे हिंदू दबक्या आवाजात बोलत होते. गावचा इतिहास आगळावेगळा होता. हिंदू–मुसलमान गुण्यागोविंदाने राहत होते.

कालांतराने गावात एक विपरीत घडले होते. एका शेतात पाच खून झाले होते. त्या काळातील इंग्रज सरकारच्या पोलिसांनी संशयावरून गढीवरील सर्व पुरुषांना पकडून नेले आणि त्यांना कैदेत टाकले होते त्यांच्यावर गुन्हा कबूल करण्यासाठी जबरदस्ती, बळजबरी केल्याचे कळल्याने गावकरी अस्वस्थ झाले. गढीतील मास्तरने सर्व प्रयत्न केले. मोठ्या रकमेची व्यवस्था विविध मार्गांनी कोर्ट खर्चासाठी करावी लागते. शेवटी गढीवरील बुढीबायची साक्ष महत्त्वाची ठरून, खरे खुनी पकडले जातात. गढीवरील सर्व तुरुंगातील, निर्दोष सुटतात. मनाजी पाटलांचा धाकटा लेक मास्तर झाला होता. त्याच्या प्रयत्नांतून आणि गावकऱ्यांच्या सहकार्यामुळे गावात एकाच जागी ज्ञानमंदिर, मसजीद महादेवाचे मंदिर निम ‍र्ण होते. विशेष म्हणजे मसजिदीवरील पूर्वीचा भंगलेला दगडी कळस काढून, नवीन बसविला गेला. अशा गावाचे कौतुक, कालांतराने उद् घाटनप्रसंगी शिक्षणमंत्री मुक्तकंठाने करतात.

"दास्तान" ही कादंबरी वाचनीय झाली आहे. त्यामधील विषय आणि मांडणी वेगळ्या प्रकारची आहे. कादंबरीतील ग्रामीण भागातील बोलीभाषा सध्याच्या अकोला जिल्ह्यातील आहे. कादंबरीतील प्रमुख पात्रे वाचकाच्या मनी दीर्घकाळ रेंगाळतील. त्याकाळची बोलीभाषा, प्रथा आणि चालीरिती समजणे काहीसे अवघड होते. त्यामुळे बोलीभाषेतील शब्दांचे, प्रमाण भाषेतील अर्थ देण्याची गरज सामान्य वाचकाला जाणवते. पुढे काय होते, ही उत्सुकता वाचकाला कादंबरी पूर्ण वाचण्यास प्रवृत्त करते. कोणत्याही परिस्थितीत गावातील एकोपा कायम राखणे, ही सर्व गावकऱ्यांची जबाबदारी असल्याची जाणीव ही कादंबरी वाचून वाचकाला निश्चितपणे होते. आजच्या काळातही ही कादंबरी वाचकाचे उत्तम प्रबोधन करते आहे. हेच "दास्तान" कादंबरीचे यश आहे!

**

**पुस्तकाचे नाव : दास्तान**
**लेखिका : डॉ. प्रतिमा इंगोले**
**प्रकाशक : मायबोली अध्ययन अंतर्गत सोनल प्रकाशन, दर्यापूर जि. अमरावती**
**प्रथमावृत्ती : ३ जून २०२४**
**पृष्ठे :१६०**
**मूल्य : रु. २००/-**

## निवडक




### मलेशिया ओपन सुपर १००० बॅडमिंटन स्पर्धा

**क्वालालम्पुर :** सात्त्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी शुक्रवारी मलेशिया ओपन सुपर १००० बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. जागतिक क्रमवारीत नवव्या स्थानावर असलेल्या भारतीय जोडीने यजमान मलेशियाची जोडी ओंग येव सिन व तेओ ई यी यांचा ४९ मिनिटांत २६-२४, २१-१० असा पराभव केला. भारतीय जोडीने आक्रमक सुरुवात केली. चिरागने जोरदार क्रॉस-कोर्ट स्मॅशद्वारे सुरुवातीला आघाडी मिळवून दिली. तथापि, मलेशियाने जोरदार मुसंडी मारून बरोबरी साधली. यानंतर सलग बॉडी स्मॅशमुळे सात्त्विक चिरागने पहिला गेम जिंकला. दुसऱ्या गेममध्ये सात्त्विक चिराग यांनी तुफानी खेळ करत बाजी मारली. स्पर्धेच्या मागील हंगामात भारताच्या सुपरस्टार जोडीला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. यावेळी ही जोडी फायनलमध्ये धडक मारेल अशी आशा आहे.

### बॅटचा दांडाच निखळला, हेल्मेट घातल्याने डोक वाचल

**सिडनी :** ऑस्ट्रेलियात सध्या बिग बॅश लीगचा थरार सुरु आहे. या स्पर्धेतील २९ व्या सामन्यात स्टार बॅटर डेविड वॉर्नरसोबत दुर्घटना घडली. सुदैवानं तो हेल्मेट घालून बॅटिंग करत असल्यामुळे मोठा अनर्थ टळला. सिडनी थंडर आणि होबार्ट हरिकेन्स यांच्यातील सामन्यात डेविड वॉर्नरसंदर्भात हा प्रकार घडला. सिडनी थंडरच्या डावात डेविड वॉर्नर फलंदाजी करत होता. गोलंदाजाने टाकलेल्या चेंडूवर त्याने जोरदार फटका मारला. बॅट अन् बॉलचा संपर्क झाला. पण त्यानंतर डेविड वॉर्नरच्या बॅटचा दांडाच निखळला. एवढेच नाही तर बॅट त्याच्या मानेच्या भागावर आपटली. हेल्मेट असल्यामुळे त्याच्यावर ओढावलेले मोठं संकट टळलं. त्यानंतर वॉर्नरनं या मॅचमध्ये नाबाद ८८ धावांची खेळी केली. होबार्ट हरिकेन्सच्या ताफ्यातील जलदगती गोलंदाज रायली मेरेडिथ याच्या गोलंदाजीवर हा सर्व प्रकार घडला. डावाच्या पहिल्याच षटकात डेविड वॉर्नर त्याला जोरदार फटका मारायला गेला तेव्हा हा प्रकार घडला. बिग बॅश लीगच्या अधिकृत एक्स अकाउंटवरुनही हा व्हिडिओ शेअर करण्यात आला आहे.





### अर्शदीपच्या गोलंदाजीने ऋतुराजचा खेळ खल्लास

**बडोदा :** भारतीय संघातील स्टार बॉलर अर्शदीप सिंग इंग्लंड विरुद्धच्या मालिकेआधी देशांतर्गत क्रिकेटमध्ये आपला जलवा दाखवून देत आहे. बडोदाच्या कोटंबी स्टेडियमवर रंगलेल्या महाराष्ट्र विरुद्धच्या लढतीत अर्शदीप सिंगनं पंजाबच्या संघाला दमदार सुरुवात करून दिली. महाराष्ट्र संघाचा कॅप्टन आणि स्टार बॅटर ऋतुराज गायकवाडला त्याने चकवा देत बोल्ड केले. एवढ्यावरच तो थांबला नाही तर विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत कमालीच्या फॉर्ममध्ये असलेल्या सिद्धेश वीर याला अर्शदीपनं खातेही उघडू दिलं नाही. महाराष्ट्र संघाचा डाव सावरत शतकी खेळी करणारा सलामीवीर अर्शीन कुलकर्णीची विकेटही अर्शदीपनंच टिपली. विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेतील तिसरा क्वार्टर फायनल सामना महाराष्ट्र विरुद्ध पंजाब यांच्यात रंगला आहे. पंजाबचा कर्णधार अभिषेख शर्मा याने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

### बिग बॉस १८ मध्ये दिसणार चहल ?

**मुंबई :** भारतीय क्रिकेटपटू लेग स्पिनर युजवेंद्र चहल सध्या त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे बराच चर्चेत आहे. चहल आणि त्याची पत्नी धनश्री वर्मा यांच्यात काहीच आलेबल नाह. ते लवकरच वेगळे होणार, अशी चर्चा अनेक दिवसांपासून सुरू आहेत. मात्र, या जोडप्याने या अफवांवर अद्याप थेटपणे कोणतंही भाष्य केलेलं नाही, पण सोशल मिडीयावरील त्यांच्या क्रिप्टीक पोस्ट पाहून अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. याचदरम्यान आता तहलबद्दल आणखी एक मोठी अपडेट समोर आली आहे. तो लवकरच 'बिग बॉस १८' या सलमान खानच्या रिॲलिटी शो मध्ये दिसणार आहे. नुकातच तो या शोच्या सेटवर दिसला होता, ज्याचे काही फोटो, व्हिडीओ समोर आले आहेत.युझवेंद्र चहल 'बिग बॉस १८' च्या सेटवर कॅज्युअल लूकमध्ये दिसला होता.



### नवीन वर्षात नव्या छोरींचा जलवा

**राजकोट :** स्मृती मानधनाच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघानं राजकोटच्या मैदानात रंगललेल्या आयर्लंड विरुद्धच्या सामन्यात दिमाखदार विजय नोंदवत नव्या वर्षाची दमदार सुरुवात केली आहे. आयर्लंडच्या संघानं पहिल्यांदा बॅटिंग करताना निर्धारित ५० षटकात ७ बाद २३८ धावा करत भारतीय महिला संघासमोर २३९ धावांचे लक्ष ठेवले होते. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाची सलामीची बॅटर प्रतिका रावल हिने ९६ चेंडूत ८९ धावांची दमदार खेळी केली. तिच्याशिवाय तेजलनं ४६ चेंडूत नाबाद अर्धशतक झळकावले. या दोघींच्या दमदार खेळीच्या जोरावर भारतीय महिला संघानं पहिला वनडे सामना ६ विकेट्स राखून जिंकला. यासह भारतीय महिला संघाने ३ सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. सौराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या राजकोटच्या मैदानात रंगलेल्या पहिल्या वनडे सामन्यात आयर्लंड महिला संघाची कॅप्टन गॅबी लुईस हिने टॉस जिंकून पहिल्यांदा फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता.

## आठ संघामध्ये क्रिकेटचा थरार

# कोण होणार चॅम्पियन्स ट्रॉफीचा मानकरी

| अलिबाग | प्रतिनिधी |

**अलिबागमधील क्रीडा भुवनमधील मैदानात गेल्या दोन दिवसांपासून क्रिकेटचा थरारा क्रीडाप्रेमींना पहावयास मिळत आहे. सुपर आठमध्ये आठ संघाची निवड झाली आहे. शनिवारी(दि.११) सायंकाळपासून या मैदानात क्रिकेट सामन्यांना सुरुवात झाली आहे. रविवारी पहाटे अडीच वाजेपर्यंत ही स्पर्धा सुरु राहणार आहे. त्यामुळे अंतिम सामन्यानंतर कोण होणार चॅम्पियन्स ट्रॉफीचा मानकरी याकडे लक्ष लागून राहिले आहे. ही स्पर्धा पाहण्यासाठी मैदानात आसन व्यवस्था करण्यात आली असून घरबसल्यादेखील स्पर्धा पाहण्याची ऑनलाईन संधी उपलब्ध करण्यात आली आहे.**

गुरुवारपासून क्रीडा भुवन येथे प्रेक्षणीय सामन्याने क्रिकेट स्पर्धेला सुरुवात झाली. आठ संघामध्ये स्पर्धा झाली. त्यात चार संघाची सुपर आठमध्ये निवड झाली. दुसऱ्या दिवशीदेखील शुक्रवारी सायंकाळपासून सामने सुरु झाले. यामधील चार संघाची सुपर आठमध्ये निवड झाली आहे. दोन दिवसीय सामन्यात आठ संघाची निवड झाली आहे. त्यामध्ये प्रफुल्ल ॲन्ड निलेश स्पोर्टस् साखर, जे.डी. भार्गवी इलेव्हन अलिबाग, ए.बी. ग्रुप अलिबाग आणि यु. व्ही. स्पोर्टस् अलिबाग, एम.डी. वॉरिअर्स, प्रदिप स्पोर्टस् साखर,





### लाखो क्रीडा प्रेमींनी लुटला आनंद

**स्थानिक खेळाडूंना हक्काचे व्यासपिठ मिळावे यासाठी अलिबागचे नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या संकल्पनेतून अलिबाग चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ नाईट टेनिस क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. आयपीएलच्या धर्तीवर एक वेगळा क्रिकेटचा आनंद या स्पर्धेच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शेतकरी कामगार पक्ष, पुरोगामी युवक संघटना अलिबाग शहर पुरस्कृत व प्रशांत नाईक मित्रमंडळ अलिबाग आयोजित क्रिकेट स्पर्धा पहाण्याचा आनंद लाखो क्रीडा प्रेमींनी लुटला आहे.**

एस.पी. सुपर प्लेअर्स आंबेपूर या आठ संघातील क्रिकेटचा थरार शनिवारी सायंकाळपासून पहावयास मिळाला. सुपर आठमध्ये निवड झालेल्या संघाच्या सामन्याअगोदर प्रेक्षणीय सामना सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबाग आणि अलिबाग पोलीस यांच्यामध्ये झाला. त्यानंतर प्रत्यक्ष स्पर्धेला सुरुवात झाली. ही स्पर्धा पाहण्यासाठी प्रेक्षकांनी अलोट गर्दी केली होती. लाखो क्रीडाप्रेमींनी घरबसल्यादेखील या स्पर्धेचा आनंद घेतला.

अंतिम सामन्यानंतर स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या संघाला अलिबाग चॅम्पियन चषक देऊन गौरविले जाणार आहे. स्पर्धेतील अंतिम विजेत्या संघाला दोन लाख रुपये, व चषक, द्वीतीय क्रमांकाला एक लाख रुपये व चषक, तृतीय व चतुर्थ क्रमांकाला प्रत्येकी ५० रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे.

दरम्यान, मालिकावीराला दुचाकी, उत्कृष्ट गोलंदाज व फलंदाज यांना सायकल आणि विजेत्या व उपविजेत्या संघाला एलईडी टीव्ही देऊन सन्मानित केले जाणार आहे.

## गोल्डन बॉयने पाकिस्तानच्या खेळाडूला टाकले मागे

| अमेरिका | वृत्तसंस्था |

पॅरिस ऑलिम्पिकचा रौप्य पदकविजेता भारताचा स्टार ॲथलीट नीरज चोप्रा याला अमेरिकेतील प्रख्यात ट्रॅक ॲन्ड फील्ड न्यूजने २०२४ मधील सर्वोत्कृष्ट भालाफेकपटूचा सन्मान बहाल केला. ऑलिम्पिकमध्ये पाकिस्तानचा अर्शद नदीम याच्यानंतर २७ वर्षांचा नीरज दुसऱ्या स्थानी राहिला होता. कॅलिफोर्निया येथील ट्रॅक ॲन्ड फील्ड न्यूज २०२४ च्या क्रमवारीत नीरजने अव्वल स्थान पटकाविले. त्याने ग्रेनेडाचा दोनवेळेचा विश्व चॅम्पियन अँडरसन पीटर्स याला मागे टाकले. नदीम हा यादीत पाचव्या स्थानावर आला. कारण

**ट्रॅक ॲन्ड फील्ड न्यूज २०२४ च्या क्रमवारीत नीरज ठरला अव्वल**



त्याने ऑलिम्पिकनंतर ज्या डायमंड लीगमध्ये भाग घेतला त्यात तो चौथ्या स्थानावर होता. ट्रॅक ॲन्ड फील्ड न्यूज १९४८ पासून काम करीत असून क्रीडा क्षेत्राचे बायबल अशी त्यांची ओळख आहे. दरवर्षी ते विश्व तसेच अमेरिकन क्रीडा रैंकिंग जाहीर करतात. निरजला हा बहुमान मिळाल्याने भारताची छाती फुगली आहे. त्यांच्या चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## सामना पाहायला आलेला प्रेक्षक झाला लखपती

### एका हाताने घेतला झेल, दुसऱ्या हाताने ९० लाख रुपये जिंकले

| सिडनी | वृत्तसंस्था |

क्रिकेट मॅच पाहायला गेला आणि लखपती होऊन परतला असं कोणी म्हंटलं तर कदाचित विश्वास बसणार नाही. पण एका क्रिकेट चाहत्यासोबत असं खरंच घडलंय. डरबन येथे टी- २० लीगमध्ये डरबन सुपर जायंट्स विरुद्ध प्रिटोरिया कॅपिटल्स यांच्यात सामना सुरु असताना एका क्रिकेट चाहत्याच नशीब फळफळलं. सामना सुरु असताना त्याने स्टॅन्डमध्ये बसून सामना पाहत असताना एका हाताने जबरदस्त कॅच पकडला. ज्यामुळे तो काही सेकंदात लखपती बनला. त्याने तब्बल ९० लाख रुपयांचे बक्षिस जिंकले आहे.

न्यूझीलंडचा स्टार फलंदाज केन विल्यमसन सध्या दक्षिण आफ्रिकेत



खेळल्या जाणाऱ्या एस ए्ट्वेन्टीमध्ये खेळत आहे. किवी फलंदाज या स्पर्धेत डर्बन सुपर जायंट्सकडून खेळत आहे. विल्यमसनने स्पर्धेतील दुसऱ्या सामन्यात एक शानदार षटकार ठोकला. जो थेट प्रेक्षकांच्या गॅलरीत पोहोचला. जिथे एका प्रेक्षकाने एका हाताने झेल घेऊन सुमारे ९० लाख रुपये जिंकले. या स्पर्धेतील दुसरा सामना डर्बन सुपर जायंट्स आणि प्रिटोरिया कॅपिटल्स यांच्यात झाला. या सामन्यात सुपर जायंट्सने प्रथम फलंदाजी करताना ४ बाद २०९ धावा केल्या होत्या. यादरम्यान केले विल्यमसनने ४० चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ६० धावांची सर्वाधिक धावांची खेळी खेळली. या खेळीदरम्यान विल्यमसनने लेग साइडवर एक उत्तुंग षटकार मारला, जो प्रेक्षक गॅलरीत पोहोचला जिथे उपस्थित असलेल्या एका चाहत्याने तो चेंडू एका हाताने पकडला. एका हाताने कॅच घेतल्याने चाहत्याला मिळाले ९० लाख रुपये या कॅचसाठी चाहत्याला २० लाख दक्षिण आफ्रिकन रँड म्हणजेच सुमारे ९० लाख रुपये मिळाले. या लीगच्या नियमांनुसार, १८ वर्षांवरील प्रेक्षकाला एका हाताने षटकाराचा क्लीन कॅच घेणाऱ्यांना १० लाख रँडचे बक्षीस ठेवले आहे. विशेष म्हणजे जर झेल घेणारा चाहता सामन्यापूर्वीच शीर्षक प्रायोजकाचा ग्राहक असेल, तर त्याची बक्षीस रक्कम दुप्पट केली जाते. या झेलवर समालोचक मार्क निकोल्स म्हणाले, 'हा चाहता क्रिकेट खेळतो का? जर खेळत असेल तर बक्षिसाची रक्कम तिप्पट करा. हा एक अप्रतिम झेल आहे. डर्बन सुपर जायंट्सने प्रथम फलंदाजीत ४ गडी गमावून २०९ धावा केल्या. प्रत्युत्तरात प्रिटोरिया कॅपिटल्सने हा सामना २ धावांनी गमावला.

## खो-खो संघाच्या कर्णधारपदी प्रियंका इंगळेची निवड

| मुंबई | वृत्तसंस्था |

आंतरराष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी निवडण्यात आलेल्या भारतीय खो-खो संघाच्या कर्णधारपदी प्रियंका इंगळे हीची निवड करण्यात आली आहे. तिच्या निवडीबद्दल तालुक्यातील सर्वच क्षेत्रातून तिचे अभिनंदन केले जात आहे. तालुक्यातील कळंबआंबा येथील हनुमंत इंगळे हे मागील काही वर्षांपासून रोजगाराच्या निमित्ताने भोसरी (जि. पुणे) येथे स्थायिक झाले. वडील हनुमंत इंगळे व आई सविता इंगळे या दाम्पत्याला प्रियंका व प्रणय अशी दोन मुले आहेत. शालेय शिक्षण घेत असताना प्रियंकाला खेळाची आवड निर्माण झाली. त्यामुळे तिची खेळातील आवड विचारात घेऊन त्यांनी तिला राजमाता जिजाऊ क्रीडा मंडळाच्या माध्यमातून प्रशिक्षक अविनाश करवंदे यांच्या मार्गदर्शनाखाली खो-खो प्रशिक्षण दिले. तिने निवडलेल्या क्षेत्रात मेहनत व सराव करून खो-खो सारख्या क्रीडा प्रकारात नैपुण्य संपादन केले. त्यामुळे तिला सात वेळा खो-खो च्या राष्ट्रीय संघात प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. या मिळालेल्या संधीचे सोने करत तिने भारतीय संघाला विजय मिळवून देण्यात आपले योगदान दिले. तिच्या या उत्कृष्ट कामगीरीची दखल घेऊन तिला यापूर्वी क्रीडा क्षेत्रातील राणी लक्ष्मीबाई व राजमाता अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. १२ ते १९ जानेवारी २०२५ याकालावधीत नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी स्टडियमवर होणाऱ्या खो-खोच्या विश्वकपसाठी भारतीय संघ जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये मुलीच्या संघाची कर्णधार म्हणून प्रियंका हनुमंत इंगळे हिची निवड झाली आहे.



सध्या दिल्लीत खो-खो च्या वर्ल्डकपची जोरदार तयारी सुरू आहे. भारतीय खो-खो संघाचे अध्यक्ष सुधांगु मित्तल यांच्या नेतृत्वाखाली गेल्या एक महिन्यापासून खेळाडू सराव करत आहेत. खो-खो स्पर्धेत जगभरातील चोवीस देशांचे खो-खो संघ सहभागी होत आहेत. कर्णधारपद प्रियंका इंगळे हिला मिळाले आहे. तिच्या या संघात आश्विनी शिंदे, रेश्मा राठोड, भिलार देवजीभाई, निरमला भाटी, निता देवी, चैत्रा आर, सुभाश्री सिंग, मगाई माजी, अंशु कुमारी, वैष्णवी बजरंग, मसरीन शेख, मिनू, मोनिका व नाझिया या खेळाडूंचा भारतीय खो-खो संघात समावेश आहे. प्रशिक्षकपदी प्राची वाईकर यांची निवड झाली आहे. सव्वीस वर्षीय प्रियंका इंगळेने आतापर्यत खो-खोच्या १७ राष्ट्रीय स्पर्धा जिंकल्या आहेत. सध्या प्रियंका खेळाडूंच्या कोट्यातून पुणे येथे क्रीडा अधिकारी पदावर नुकतीच सेवेत रूजू झाली आहे.



## तमीम आणि ॲलेक्स यांच्यातील वाद टोकाला

**| ढाका | वृत्तसंस्था :** क्रिकेटच्या मैदानावरील एक वाद सध्या प्रचंड चर्चेत आला आहे. हा वाद बांगलादेश प्रीमियर लीगच्या एका सामन्यातील आहे. या भांडणाची बरीच चर्चा रंगली आहे. या भांडणात बांगलादेशी क्रिकेटर तमीम इक्बाल याने सर्व मर्यादा ओलांडल्याचे दिसत आहे. वास्तविक, ही संपूर्ण घटना बांगलादेश प्रीमियर लीगच्या एका सामन्यात घडली जेव्हा रंगपूर रायडर्सचा सलामीवीर फलंदाज ॲलेक्स हेल्स हा फॉर्च्युन बरीशाल संघाचा कर्णधार तमीम इक्बाल याच्याशी हस्तांदोलन करण्यासाठी गेला असता वाद निर्माण झाला. तमिमने हेल्सवर वैयक्तिक टिप्पणी केली. तु अजूनही ड्रग्ज घेतोस का अशा प्रश्न तमीने आपल्याला केला होता, असे हेल्सने सांगितले.

२०१९ मध्ये ॲलेक्स हेल्सवर ड्रग्ज घेतल्याचा आरोप झाला होता, त्यामुळे त्याच्यावर इंग्लंड क्रिकेट बोर्डाने बंदी घातली होती. तमिमने हेल्सवर कमेंट केली होती.

### दक्षिण आफ्रिकेतील बंदीचा केला सामना | महालिंगम यांनी प्रेयसीसाठी देश सोडला

## बॉलीवुडला लाजवणारी खेळाडूची प्रेमकहाणी

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

क्रिकेटला धर्म मानल्या जाणाऱ्या भारतात क्रिकेटपटूंबाबत क्रिकेटप्रेमींमध्ये खूप कुतूहल असतं. क्रिकेटपटूंच्या खेळापासून ते त्यांच्या वैयक्तिक जीवनापर्यंत सर्व बाबींवर क्रिकेटप्रेमींची बारीक लक्ष असतं. त्यामुळे क्रिकेटपटूंच्या लव्हस्टोरी, अफेअर्स आणि ब्रेकअप चवीने चर्चिल्या जातात. अशी लव्हस्टोरी तुम्ही याआधी कधी ऐकली असण्याची शक्यता फारच कमी आहे.



स्टेट बँकेच्या शाखेत चलन बदलत असनाता सुरू झालेल्या या लव्हस्टोरीमधील भारतीय क्रिकेटपटूने आपल्या गर्लफ्रेंडसाठी चक्क देश सोडला. तसेच काही काळ बंदीचाही सामना केला. मात्र आपलं प्रेम यशस्वी करून दाखवलं. या भारतीय क्रिकेटपटूचं नाव आहे महालिंगम व्यंकटेशन यांनी आपल्या प्रेमासाठी जे काही केलं त्यासमोर बॉलिवूडच्या अनेक रोमँटिक चित्रपट फिके पडतील अशी आहे. ७०-८० च्या दशकाच्या अखेरीपर्यंत भारतातील प्रादेशिक आणि देशांतर्गत क्रिकेटमधील प्रमुख नावांपैकी एक असलेल्या महालिंगम यांनी प्रेमासाठी अशी काही जोखीम पत्करली की त्यामुळे त्यांचं जीवनच बदलून गेलं. आता महालिंगम व्यंकटेशन यांनी स्वत:च त्यांच्या लव्हस्टोरीची रंजक माहिती सांगितली आहे. ते सांगतात की, माझी पत्नी मुळची दक्षिण आफ्रिकेतील आहे. ती १९८३ मध्ये भारतात आली असताना मी तिला भेटलो. त्यानंतर काही दिवसांनी ती परत दक्षिण आफ्रिकेत गेली. मग माझं प्रेम मिळवण्यासाठी मीसुद्धा दक्षिण आफ्रिकेत जाण्याचा मार्ग पत्करला. त्यांनी पुढे सांगितले की, तेव्हा प्रवास करणं एवढं सोपं नव्हतं. कुणीही सहजपणे दक्षिण आफ्रिकेत जाऊ शकत नव्हतं. मात्र मला भारत सरकारकडून विशेष परवानगी मिळाली आणि त्याच वर्षी मी दक्षिण आफ्रिकेत गेलो. दक्षिण आफ्रिकेत माझे एक नातेवाईक राहतात, त्यांना भेटण्यासाठी मी जात आहे, असे मी त्यांना सांगितले. त्या काळी केवळ कागदावर लिहिलेहा व्हिसा मिळत असे. दर्बानला उतरल्यानंतर मी जेव्हा प्रिसिला हिला फोन केला तेव्हा तिचा मी आफ्रिकेत आलो यावर विश्वासच बसला नाही.

### दक्षिण आफ्रिकेकडून खेळणारे पहिले भारतीय

महालिंगम व्यंकटेशन यांनी पुढे सांगितले की, पुढे दक्षिण आफ्रिकेत माझ्यावर बंदी घालण्यात आली. खरंतर चार सामन्यात मी चांगला खेळलो होतो. निवड समितीला बेन्सन अँड हेजेस स्पर्धेसाठी भेटायचं होतं. माझी निवडही झाली. मात्र त्याचवेळी मी दक्षिण आफ्रिकेतील नसल्याचं त्यांना कळलं. त्यानंतर माझ्यावर बंदी घालण्यात आली. मी भारतात परतलो. मात्र दक्षिण आफ्रिकेकडून खेळणारा मी पहिला भारतीय ठरलो होतो. त्यानंतर व्यंकटेशन यांची पत्नी १९८६ मध्ये भारतात आली. त्याचवर्षी दोघांनीही विवाह केला. पुढे दोघांनीही एकत्र संसार केला. तसेच २००० साली व्यावसायिक क्रिकेटमधून निवृत्ती स्वीकारल्यानंतर महालिंगम यांनी रेस्टॉरंटच्या व्यवसायात पदार्पण केले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)